



# भगतसिंग, चंद्रशेखर आझाद आणि इतर क्रांतिकारक

लेखक : अजय घोष  अनुवाद : आत्माराम वैद्य

MR
954.038
G 346 B

MR
954.038
G346B

INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA

# भगतसिंग, चंद्रशेखर आझाद आणि इतर क्रांतिकारक

लेखक : अजय घोष

अनुवाद : आत्माराम वैद्य

इन्दराज
Entered

लोकवाङ्मय गृह

भगतसिंग, चंद्रशेखर आझाद आणि इतर क्रांतिकारक / अजय घोष /
अनुवाद : आत्माराम वैद्य /
Bhagatsingh, Chandrashekhar Azad Ani Etar Krantikarak /
Ajay Ghosh, Translated by Atmaram Vaidya

Library IIAS, Shimla
MR 954.038 G 346 B
00124325

म / ९९६
© लोकवाङ्मय गृह
पहिली आवृत्ती : मार्च १९८१
दुसरी आवृत्ती : एप्रिल १९८१
तिसरी आवृत्ती : २८ सप्टेंबर २००६
चौथी आवृत्ती : मे २००७

किंमत : ४० रुपये

ISBN 81-88284-79-3

124325
31-3-08
MR
954.038
G346B

मुद्रक/प्रकाशक
प्रकाश विश्वासराव
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५

मुद्रणस्थळ
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

## प्रकाशकाचे मनोगत

भगतसिंग यांच्या २८ सप्टेंबर २००६ पासून सुरू होणाऱ्या जन्म-शताब्दीच्या निमित्ताने भगतसिंग यांचे त्या वेळचे सहकारी अजय घोष यांच्या पुस्तिकेच्या कॉ. आत्माराम वैद्य यांनी केलेल्या अनुवादाची तिसरी आवृत्ती 'लोकवाङ्मय गृहा'तर्फे सादर करण्यास आम्हाला आनंद होत आहे. मधल्या काळात या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीला प्रस्तावना लिहिणारे कॉ. एस. जी. सरदेसाई तसेच कॉ. आत्माराम वैद्य यांचेही निधन झाले आहे. या सर्वांच्या स्मृतीला सादर प्रणाम.

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या हौतात्म्याला पन्नास वर्षे झाली. तरीही आजतागायत त्यांचा विसर कुणाला पडलेला नाही. त्यांच्या अलोट धैर्याने आणि त्यागाने देशात जे चैतन्य निर्माण केले, ते आजच्या तरुण पिढीलाही क्रांतिकारी स्फूर्ती देत आहे.

क्रांतिवीर चंद्रशेखर आझाद यांनी निर्माण केलेल्या 'हिंदुस्थान समाजवादी प्रजासत्ताक संघटने'चे भगतसिंग आणि त्यांचे साथी सभासद होते. त्यांच्यापैकी एकेकजण हा अक्षरश: देशप्रेमाने भारून गेलेला धैर्याचा मेरुमणी होता. ब्रिटिश सत्तेच्या अमानुष क्रौर्याला तुच्छ लेखून या सत्तेच्या विरुद्ध आमरण आणि हसतमुखाने झगडणे हे त्यांचे ब्रीद होते.

त्या वीरांची त्यांच्याच एका सहकाऱ्याने लिहिलेली ही कथा. आजसुद्धा कोणाही वाचकाला ती चित्तथरारक वाटेल आणि त्यांच्या स्मृतीने वाचक नतमस्तक झाल्याशिवाय राहणार नाही.

या कथेचे लेखक कॉ. अजय घोष हे पुढे कम्युनिस्ट पक्षात सामील झाले, पक्षाचे सरचिटणीस झाले. मरणापूर्वी भगतसिंगही साम्यवादाच्या उंबरठ्यावर येऊन पोचले होते. त्यानंतर अंदमानात काळ्या पाण्याची शिक्षा भोगणारे बहुतेक सर्व क्रांतिकारक कम्युनिस्ट पक्षातच आले.

नंतर स्वराज्य आले. काळ बदलला. गेल्या चौतीस वर्षांत देशात भांडवलशाहीची वाढ होऊन आता ही समाजव्यवस्था एका खोल गर्तेत सापडली आहे. एकीकडे अमेरिकन साम्राज्यशाहीचे अक्राळविकाळ स्वरूप व दुसरीकडे सोविएत युनियन व इतर समाजवादी आणि राष्ट्रीय स्वातंत्र्यवादी शक्ती यांचा मुकाबला साऱ्या जगभर चालू आहे. आपला देशही त्याच संघर्षातून जात आहे. या काळात भारतातील कम्युनिस्ट चळवळ अनेक अग्निदिव्यांतून गेली आहे.

भगतसिंगांच्या काळात समाजवादी क्रांतीचा मार्ग जितका खडतर वाटत होता, त्याहूनही तो किती कठीण आणि गुंतागुंतीचा आहे, याचा आपल्याला अनुभव आला आहे. अशा वेळी स्वातंत्र्यपूर्व काळातील क्रांतिकारकांची जीवनयात्रा ही आपली एक अमूल्य ठेव आहे. आपला आत्मविश्वास आणि निश्चय यांना बळकटी देणारी शक्ती आहे. म्हणून या पुस्तिकेच्या हजारो प्रती महाराष्ट्राच्या खेडोपाडी पोचल्या पाहिजेत.

मूळ इंग्रजी पुस्तिकेचे मराठी भाषांतर कॉ. आत्माराम वैद्य यांनी इतके बेमालूम केले आहे की ते भाषांतर आहे असे क्षणमात्र वाचकाला वाटणारच नाही. कसलाही गाजावाजा न करता, प्रसिद्धीची यत्किंचित इच्छा न बाळगता ज्यांनी पक्षाची प्रत्येक जबाबदारी काटेकोरपणे पार पाडलेली आहे, अशा आमच्या पक्षसभासदांत कॉ. आत्माराम वैद्य यांची गणना आहे. असे निष्ठावंत कार्यकर्ते हाच आमच्या शक्तीचा कणा आहे.

भगतसिंग आणि अजय घोष यांच्या अमर स्मृतीला मी श्रद्धांजली अर्पण करतो.

मुंबई, ५ एप्रिल १९८१ **एस. जी. सरदेसाई**

# भगतसिंगशी परिचय

आपल्या देशात ब्रिटिश राज्यसत्तेच्या विरुद्ध केलेल्या राजकीय कटांचे खटले बरेच झाले, पण १९२९-३० साली झालेल्या 'लाहोर कटा'च्या खटल्याने जनतेचे लक्ष जितके जबरदस्त खेचले गेले, तितके पूर्वीच्या कोणत्याही खटल्याने खेचले गेले नव्हते. मध्यवर्ती असेंब्लीत ज्या दिवशी बॉम्ब पडला त्या दिवसापासून ते भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांना फाशीची शिक्षा होऊन या खटल्यावर शेवटचा पडदा पडेपर्यंत जनतेच्या नजरा या खटल्यावर केंद्रित झाल्या होत्या. राजकीय कैद्यांच्या प्रश्नावर त्यांनी दिलेले असंख्य लढे व त्यांचा ज्या तत्त्वप्रणालीवर विश्वास होता त्या तत्त्वप्रणाली या खटल्यामुळे जनतेपुढे स्वच्छ प्रकाशात आल्या.

भगतसिंग व त्यांचे सहकारी जनतेच्या गळ्यातील ताईत झाले. त्यांच्याबद्दल नाना तऱ्हेच्या आख्यायिका पसरल्या. त्यांतल्या काही खऱ्या होत्या, तर काही जनतेने त्यांच्याबद्दलच्या प्रेमापोटी आपल्याच मनाने निर्माण केलेल्या होत्या. त्या काळात सर्वत्र त्यांच्याबद्दलची गाणी आणि त्यांच्यावर रचलेल्या कविता ऐकायला मिळत असत.

एकाएकी प्रसिद्धीच्या झोतात आलेले हे लोक होते तरी कोण? ते कोणत्या ध्येयाने प्रेरित झाले होते? मध्यवर्ती असेंब्लीत टाकलेल्या एका बॉम्बमुळे जनतेच्या मनात त्यांच्याबद्दल एवढी सहानुभूती व आदर का निर्माण झाला? या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न मी इथे करणार आहे.

माझ्या आठवणीप्रमाणे भगतसिंगची व माझी पहिली ओळख कानपूरमध्ये १९२३ साली बटुकेश्वर दत्त यांनी करून दिली. मी त्या वेळेस पंधरा वर्षांचा होतो आणि भगतसिंगही माझ्याच वयाचा असावा. माणूस तसा चांगला उंच

पण शरीराने जरा किडकिडीतच होता. अव्यवस्थित कपडे, स्वभावाने फारच शांत! भगतसिंगबद्दल माझे पहिले मत हा शहरी टापटिपीचा अभाव असलेला एक खेडवळ व स्वत:बद्दल आत्मविश्वास नसलेला मुलगा आहे असेच झाले. माझे हे मत भगतसिंग मला भेटून गेल्यानंतर त्याच वेळेस मी श्री. दत्तना सांगूनही टाकले.

काही दिवसांनंतर माझी व त्याची परत भेट झाली. त्या वेळी आमच्या खूप गप्पा झाल्या. ते दिवस असे होते की, आम्ही क्रांतीची स्वप्ने अत्यंत बालिशपणे पाहत होतो. क्रांती अगदी उंबरठ्यावर आलेली आहे आणि हे स्वप्न साकार व्हायला फारच थोडी वर्षे लागतील असेच आम्हाला वाटायचे. भगतसिंगला मात्र याबद्दल फारशी खात्री वाटत होती असे दिसले नाही. त्या वेळचे त्याचे शब्द मला आज आठवत नाहीत; पण एवढे मात्र आठवतेच की देशामध्ये साम्राज्यशाहीविरुद्ध जेवढा असंतोष असायला पाहिजे तेवढा आपल्या देशात नाही, आपल्या देशात सर्वत्र अगतिकतेचे व निष्क्रियतेचे वातावरण आहे आणि हे बदलण्यासाठी जनतेला जागृत करायचे काम किती कठीण आहे असे विचार त्याच्या मनात अधिक होते.

गप्पांच्या ओघात ज्या वेळेस भगतसिंग मागच्या काळातील लोकांनी क्रांती करण्याचे कसकसे प्रयत्न केले याबद्दल, १९१५-१६ साली हुतात्मे झालेल्या शहिदांबद्दल व विशेषत: पहिल्या लाहोर कटाच्या खटल्यातील महत्त्वाच्या व्यक्तींबद्दल—विशेषत: सरदार कर्तारसिंग यांच्याबद्दल—बोलू लागला, त्या वेळेस मला भगतसिंग निराळाच दिसू लागला.

सरदार कर्तारसिंगांना फाशी देण्यात आले त्या वेळेस आम्ही अगदीच लहान मुले होतो. त्यामुळे त्यांच्या भेटीचा योग आम्हाला येणे शक्यच नव्हते. आम्हाला एवढेच माहीत होतो की, सरदार कर्तारसिंग हा त्या वेळेस केवळ अठरा वर्षांचा एक तरुण होता. तसेच आम्हाला हेही ऐकून माहीत होते की बाबा सोहनसिंग भाकना, बाबा रुरसिंग व पृथ्वीसिंग आझाद हे त्या वेळच्या गदर पार्टीचे प्रमुख पुढारी होते व १९१५-१६ साली आपल्या देशातून ब्रिटिश सत्तेला सशस्त्र उठाव करून उलथवून टाकण्यासाठी ही मंडळी कॅनडाहून भारतात आली होती. सरदार कर्तारसिंग त्यांचेच साथीदार होते. ते एक उत्कृष्ट संघटक तर होतेच; पण त्यांच्या लढाऊ वृत्तीचा त्यांच्या शत्रूंनाही अभिमान वाटावा अशा तोलाचे ते एक तरुण क्रांतिकारक होते. मी अक्षरश: त्यांची पूजा करीत असे. माझ्या या अत्यंत आवडत्या नेत्याबद्दल कोणी आवेशाने बोलला की, मला भरून

यायचे. या प्रसंगानंतर भगतसिंग व मी एकमेकांचे अत्यंत जिवाभावाचे मित्र झालो.

## काकोरी कटाचा खटला आणि त्यानंतरचा काळ

१९२५ साली आमच्यावर जणू आकाशच कोसळून पडले. काही आठवड्यांच्या आतच काकोरी कटाच्या खटल्याच्या निमित्ताने आमचे जवळ जवळ सगळेच पुढारी तुरुंगाच्या गजाआड अडकून पडले. झडत्या, घरपकडी, सहानुभूतीदारांच्या मागे पोलिसांचा ससेमिरा ही रोजचीच गोष्ट होऊन बसली. जी मंडळी आमच्या कार्याला पाठिंबा दर्शवायची तीच आता आमच्यापासून तोंडे लपवू लागली. आमच्या कार्याबद्दल ज्या तरुण मुलांशी आमचे बोलणे झाले होते व ज्यांना क्रांतिकारक मार्गावर आणण्यासाठी पहिला टप्पा म्हणून आम्ही कानपूरमध्ये एक व्यायामशाळा सुरू केली होती, त्यातही ही तरुण मंडळी येईनाशी झाली. सबंध प्रांतातच काकोरी खटल्याच्या निमित्ताने झालेल्या धरपकडीमुळे व पोलिसांच्या झडत्यांच्या सत्रामुळे मोठी घबराट निर्माण झाली होती. या घटनांमुळे क्रांतीबद्दलच्या माझ्या मनात ज्या स्वप्नाळू कल्पना होत्या, त्यांना चांगलाच हादरा बसला.

१९२६ साली मी उच्च शिक्षणासाठी कानपूर सोडून अलाहाबाद विद्यापीठात दाखल झालो. काकोरीच्या धरपकडीनंतर पार्टीची जी मोडतोड झाली होती ती परत एकसंध करण्याचा आमचा प्रयत्न इथे चालूच होता. हे काम मात्र अत्यंत खडतर होते. क्रांती अगदी उंबरठ्यावर येऊन पोचली आहे, हे आमचे सुरुवातीचे स्वप्नाळू निदान किती चूक होते याची पुरेपूर जाणीव आम्हाला झाली. आता क्रांती जवळ तर नाहीच; पण अतिशय दूर आहे असेच आम्हाला वाटू लागले.

१९२१-२२ साली काँग्रेसच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या असहकाराच्या चळवळीचा पराभव झाला होता. 'फेरवादी' व 'नाफेरवादी' असे काँग्रेसचे दोन भाग झाले होते. गांधीजींच्या आशीर्वादाने 'स्वराज्य पार्टी' देशात मूळ धरायला लागली होती. कायदेमंडळासारख्या सनदशीर मार्गापलीकडे देशात कसलीच चळवळ नव्हती. जाहीर सभा फार होत नसत व झाल्या तर त्याबद्दल जनतेत बिलकूल उत्साह नव्हता. देशातील राजकारणाला पाण्याचा वाहता प्रवाह बंद झाल्यावर येणारे डबक्यासारखे संथ स्वरूप आले होते. याचा परिणाम त्या काळच्या क्रांतिकारक विचारसरणी असलेल्या तरुणांत अत्यंत निराशेची भावना निर्माण होण्यात झाला होता. आणि त्यामुळेच ही तरुण मंडळी दहशतवादाच्या

मार्गाकडे खेचली गेली.

चळवळीत आलेली ही भयाण शांतता भग्न करून चळवळ पुढे कशी नेता येईल याबद्दल आमच्यामध्ये खूपच वादविवाद चालू होते. याच सुमारास समाजवादी विचारसरणीचे वाङ्मय आपल्या देशात हळूहळू यायला लागले होते. रशियामध्ये 'ऑक्टोबर क्रांती' यशस्वी झालेली होती. कामगारवर्गाचे हे समाजवादी राष्ट्र बलवान होऊ लागले होते; इतकेच नव्हे तर सोविएत युनियन आशिया खंडातल्या चीन व तुर्कस्थान या देशांना साम्राज्यवाद्यांविरुद्ध लढण्यासाठी साहाय्यही करत होते. त्यामुळे आम्ही समाजवादी राष्ट्र व त्यात अंगभूत असलेल्या समाजवादी तत्त्वांकडे आकर्षित झालो.

अशाच प्रकारची आणखी एक घटना खुद्द आपल्याच देशात झाली. या घटनेचे महत्त्व त्या वेळेस जरी आम्हाला नीट उमगले नसले, तरी तिचा आमच्यावर नक्कीच परिणाम झाला. सारा देश अगदी थंड व निरुत्साही वातावरणात असताना मुंबई गिरणी कामगार युनियनच्या नेतृत्वाखाली झालेला त्या वेळचा प्रचंड संप-लढा हीच ती घटना. या लढ्याचे पडसाद कलकत्ता व कानपूरसारख्या औद्योगिक शहरांवर उमटताना आम्ही पाहिले.

आपल्या जनतेला ब्रिटिश साम्राज्यवादी शत्रूविरुद्ध जागृत करण्यासाठी दहशतवाद, सशस्त्र उठाव यांशिवाय दुसरा मार्ग नाही याबद्दल आमचे मत अगदी पक्के झाले होते; पण त्याचबरोबर आम्हाला हेही समजून चुकले होते की नुसत्या दहशतवादी मार्गाने स्वराज्य मिळणार नाही. या समजुतीमधून काही प्रश्नांची ढोबळ मांडणी आमच्या मनात आकार घेऊ लागली. दहशतवादी कृत्यांमधून पेटलेल्या जनतेच्या चळवळीला कोणते वळण द्यावे? ब्रिटिश सत्तेनंतर या देशात कोणत्या प्रकारचे सरकार असावे? त्या दृष्टीने आमच्या कार्यकर्त्यांमध्ये चर्चाही व्हायला लागली होती.

या काळात भगतसिंग पंजाबमध्ये सक्रिय कार्य करीत होता. भगतसिंग आणि त्याच्या तिथल्या साथीदारांनी 'नौजवान भारत सभा' नावाची तरुणांची एक लढाऊ संघटना स्थापन केली. ब्रिटिश सत्तेविरुद्ध सरळ सरळ लढ्याच्या आवश्यकतेचा व समाजवादी विचारसरणीचा प्रचार करणे, तसेच दहशतवादी पक्षात तरुणांची भरती करणे हा या संघटनेचा उद्देश होता. पंजाबमध्ये या संस्थेचा फारच थोड्या दिवसांत जोरदार प्रसार झाला आणि त्याचा परिणाम पंजाबमधील तरुणांना जहाल राजकारणाकडे आकर्षित करण्यात झाला.

याच सुमारास सोहनसिंग जोश यांच्या संपादकत्वाखाली निघत असलेल्या 'कीर्ती' या वर्तमानपत्राच्या संपादकीय मंडळावरही भगतसिंग काम करू लागला होता.

## हिंदुस्थान समाजवादी प्रजासत्ताक संघटना

१९२८ साल. एके दिवशी माझ्या खोलीत एका इसमाने प्रवेश केला. खोलीत आलेला इसम चांगला उंचापुरा आणि शरीरानेही भरलेला होता. त्याच्या डोळ्यांतील तेज आणि चेहऱ्यावरील भाव पाहून हा नक्कीच चांगला हुशार माणूस आहे असे कुणाचेही मत झाले असते. तो एक निराळाच इसम दिसत होता. हा दुसरा-तिसरा कुणी नसून प्रत्यक्ष भगतसिंगच आहे हे समजल्यानंतर मी आश्चर्यचकित झालो. त्या वेळी माझे आणि त्याचे जे बोलणे झाले, त्यावरून तर माझी खात्रीच पटली की भगतसिंग बाह्य रूपातच बदललेला नाही तर त्याच्या विचारसरणीतील प्रगल्भताही खूपच वाढलेली आहे.

त्याच्याकडूनच मला समजले की, आता यापुढे आम्ही सर्व 'हिंदुस्थान समाजवादी प्रजासत्ताक संघटने'चे सभासद झालेले आहोत. पक्षाची एक मध्यवर्ती कमिटी नियुक्त करण्यात आलेली होती. तिच्याखाली राज्य व जिल्हा कमिट्या काम करणार होत्या. मुख्य म्हणजे यापुढील काम निरनिराळ्या कमिट्यांत विचारविनिमय करून होणार होते व सर्व निर्णय बहुमताने घेण्यात येणार होते. अशा रीतीने पक्षाची संघटना परत नव्याने बांधण्यात आली.

स्वातंत्र्य व समाजवाद आणण्यासाठी कोणत्या मार्गाचा अवलंब करावा हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न समोर होता. या बाबतीत वैयक्तिक व गटागटाने सशस्त्र कृती केली जावी असे आमचे पक्के मत झालेले होते. सनदशीर उपायांच्या मागे लागून अगदी वैफल्याप्रत पोचलेल्या आपल्या देशाला सशस्त्र कृतीशिवाय दुसऱ्या कोणत्याही मार्गाने जाग येणार नाही, याची आम्हाला खोल जाणीव झालेली होती.

आमची अशी प्रामाणिक धारणा होती की ब्रिटिश सत्तेच्या प्रमुख व्यक्तींवर निवडक ठिकाणी व योग्य वेळी आम्ही सशस्त्र हल्ले केल्यास देशात पसरलेली भयाण शांतता नष्ट होईल. अशा रीतीने सर्व जनतेच्या संघटित चळवळीचा जन्म होऊन तिच्या आघाडीचे सशस्त्र दल म्हणून आम्ही या जन-चळवळीला समाजवादाच्या मार्गाने पुढे नक्की नेऊ शकू असे आम्हाला मनोमन वाटे. सर्व जनतेच्या स्वातंत्र्यलढ्यात आमची जी भागीदारी होणार होती तिचा दृश्य परिणाम

हिंदुस्थान खरोखरीच समाजवादी राष्ट्र होण्यात होईल, असा आमचा विश्वास होता.

या काळात आणि त्यानंतरही जे जे लोक भगतसिंगला भेटले ते सर्व त्याने अंगीकारलेल्या धोरणाबाबतचे स्पष्ट विचार, त्याची राजकीय प्रगल्भता व आपला मुद्दा आवेशपूर्ण शब्दांत मांडण्याची हातोटी पाहून चकित व्हायचे. भगतसिंग हा काही मोठा पट्टीचा वक्ता होता असे नाही; पण त्याच्या बोलण्यातला जोश, अंगीकारलेल्या कार्याबद्दलची आत्मीयता व तळमळ इतक्या प्रकर्षाने पुढे यायची की, कुणीही ऐकणारा माणूस त्याच्याकडे एकदम आकर्षित व्हायचा.

मी आणि भगतसिंगने चर्चा करण्यासाठी रात्री रात्री बाहेर भटकण्यात घालवल्या. कधी कधी आमच्या गप्पा इतक्या रंगायच्या की, रात्र संपून सकाळचे कोवळे लाल किरण आकाशात दिसू लागेपर्यंत त्या चालूच असायच्या. मला तर त्या वेळेस असे वाटायचे की, हा सूर्यप्रकाश आमच्या पक्षाला तेजस्वी करण्यासाठीच जणू आकाशातून येत आहे. आम्हाला काय करायचे आहे याची आम्हाला चांगलीच कल्पना आलेली होती व ध्येयाप्रत कसे जायचे त्याचाही मार्ग आम्हाला सापडला अशी आमची ठाम समजूत झाली होती.

त्या वेळच्या आमच्या समाजवादाबद्दलच्या कल्पना या अशा होत्या. त्या वेळचे राष्ट्रीय पुढारीपण सनदशीर उपायांचा अवलंब करून जनतेला निराशेच्या गर्तेत लोटण्याच्या कारवाया करीत होते, त्याचा आम्हाला अगदी वीट आला होता आणि म्हणून आम्हाला असा आत्मविश्वास वाटू लागला होता की, आम्ही आमच्या सशस्त्र हल्ल्यांच्या उठावातून जनतेसमोर एक आदर्श ठेवू शकू— ज्याच्यातून एका नव्या राष्ट्रीय नेतृत्वाचा जन्म होईल. सत्ता काबीज केल्यानंतर समाजवाद हे तर आमचे ध्येय होतेच; परंतु त्याहीपेक्षा मुख्य म्हणजे समाजाची पुनर्रचना करण्यात समाजवादी दृष्टिकोन एखाद्या दीपस्तंभासारखा आम्हाला मार्गदर्शन करणार होता.

## आमच्यावर झालेला पहिला हल्ला

१९२८ साली ब्रिटिश सत्तेने 'सायमन कमिशन' नावाचे एक मंडळ आपल्या देशात पाठवले होते. त्याच्या निषेधार्थ साऱ्या देशात संप व निदर्शने होऊ लागली होती. "सायमन परत जा" अशा घोषणा करत मुंबईच्या कामगारवर्गाने एक दिवसाचा संपही केलेला होता. पुढे हे मंडळ भारतात जिथे जिथे गेले तिथे जनसमुदायाने त्याचे असेच 'स्वागत' केले होते. काँग्रेसच्या असहकाराच्या चळवळीनंतर पहिल्याप्रथमच आपल्या देशात हे निषेधाचे दृश्य दिसू लागले

होते; ही फारच महत्त्वाची गोष्ट होती.

लाहोरमध्ये या मंडळाचे जेव्हा आगमन झाले तेव्हा जनतेच्या विरोधी निदर्शनावर पोलिसांनी अमानुष हल्ला केला. आपल्या राष्ट्रीय चळवळीचे नेते लाला लजपतराय या निदर्शनाचे नेतृत्व करताना पोलिसांच्या क्रूर लाठीहल्ल्यात भयंकर जखमी झाले व त्यातच त्यांचा थोड्याच आठवड्यात अंत झाला. सारा देश दुःखसागरात बुडून गेला. लालाजींच्या मृत्यूमुळे जनतेला दुःख तर झालेच; पण त्याहीपेक्षा साम्राज्यवादी सत्तेविरुद्धचा तिचा राग जास्त उफाळून आला. त्याचबरोबर आपल्या एका मान्यवर नेत्यावर दिवसाढवळ्या एवढा हल्ला होऊन त्यात त्यांचा मृत्यू होतो, तरीही ह्या भेकड अत्याचार करणाऱ्या सत्तेविरुद्ध आपण काहीच करू शकत नाही या जाणिवेने जनता एक प्रकारे हवालदिल झाली.

आमच्या पक्षाने सरकारच्या या पाशवी अत्याचाराला ठामपणे उत्तर द्यायचे ठरवले. १९२८ साली लाहोरच्या निदर्शकांवर हा क्रूर लाठीहल्ला करणाऱ्या सॉंडर्स नावाच्या ब्रिटिश पोलीस अधिकाऱ्याचा प्रत्यक्ष लाहोर पोलीसखात्याच्या मुख्य कार्यालयासमोर गोळी घालून मुडदा पाडण्यात आला. आम्ही अगदी योग्य वेळी केलेल्या या धाडसी कृत्याचे जनतेने मोठ्या उत्साहाने स्वागत केले. जनतेत आलेली उदासीनता घालवून तिच्यात ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढण्याची भावना निर्माण करण्यात आमच्या ह्या पहिल्याच हल्ल्याने सुरुवात झाली असे म्हणायला हरकत नाही.

नंतरच्या घटना फारच झपाट्याने सुरू झाल्या. एका वर्षाच्या आत देशाला वसाहतीच्या स्वायत्ततेचा दर्जा जर दिला गेला नाही, तर या देशात संपूर्ण स्वातंत्र्याचा झेंडा फडकवण्यात येईल अशा तऱ्हेची धमकी ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना १९२८ साली कलकत्ता येथे झालेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनात देण्यात आली. अशा रीतीने अगतिकतेचा व निराशावादाचा जो काळा ढग आपल्या देशावर ठाण मांडून बसला होता, तो विरून जाण्याच्या मार्गाला लागला. देशात सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण होऊ लागले. जागोजागी तरुणांच्या संघटना उदयाला येऊ लागल्या. मुंबईत पुन्हा एकदा कामगारांचा मोठा संप होणार अशी लक्षणे दिसू लागली.

१९२१-२२च्या असहकारितेच्या चळवळीने सारा देश जसा खडबडून जागा झाला; तसाच प्रकार पुन्हा होणार असे आम्हाला वाटू लागले. पुढील काळात होणाऱ्या मोठ्या लढ्याची चाहूल आम्हाला स्पष्ट लागली होती. पुढे येणाऱ्या घटनांना तोंड देण्यासाठी व त्यातील आमचा सहभाग योग्य रीतीने बजावण्यासाठी

आम्ही जोरदार तयारीला सुरुवात केली. जतीन दासला कलकत्त्याहून खास आमच्या साथीदारांना शस्त्रे चालविण्याचे शिक्षण देण्यासाठी मुद्दाम बोलावून घेण्यात आले. या कामासाठी लागणारी शस्त्रे व ती मिळवण्यासाठी लागणारा पैसा आम्ही गोळा करायला लागलो.

१९२९ सालच्या मार्च महिन्यात साऱ्या देशभर कम्युनिस्ट व ट्रेड युनियन पुढाऱ्यांना अटक करण्यात आल्याचे वृत्त झळकले. अलाहाबादमध्ये शिक्षण घेत असलेले व तरुणांच्या संघटनेचे एक पुढारी पी. सी. जोशी यांनाही पकडण्यात आले. पी. सी. जोशींच्या अटकेच्या निषेधार्थ आमच्या इथल्या विद्यार्थ्यांनी निदर्शनेही केली.

भगतसिंग व आमच्यापैकी बरेच जण कम्युनिस्ट पुढाऱ्यांना अनेक वेळा या अगोदरच भेटलेले होते. ते करीत असलेल्या कार्याबद्दल आमच्या मनात सहानुभूतीची भावना होती. एकदा तर त्यांच्या आणि आमच्या पक्षामध्ये काही कार्यक्रमाच्या बाबतीत सहकार्यही करावे असा आम्ही विचार करीत होतो. म्हणजे कम्युनिस्टांनी जनतेला संघटित करून त्यांचे मोठे लढे घडवून आणावेत व आम्ही 'हिंदुस्थान समाजवादी प्रजासत्ताक संघटने'च्या लोकांनी त्या लढ्यांच्या सशस्त्र विभागाची आघाडी सांभाळावी. परंतु कम्युनिस्टांचा 'वैयक्तिक' सशस्त्र हल्ल्यांना तत्त्वत: विरोध आहे व त्यांच्या मते अशा हल्ल्यामुळे चळवळीची हानीच होईल हे समजल्यानंतर आम्ही अंगीकारलेल्या कार्यपद्धतीच्या दृष्टीने त्यांच्याशी काही सहकार्य होऊ शकेल ही गोष्ट आम्ही आमच्या मनातून काढून टाकली. तरीसुद्धा त्यांचा साम्राज्यवादाबद्दल असलेला कट्टर द्वेष, सनदशीर मार्गानेच चळवळ झाली पाहिजे या धोरणाला असलेला त्यांचा विरोध व समाजवाद या देशात आणण्यासाठी प्रत्यक्ष लढ्याची आवश्यकता या गोष्टींवर ते देत असलेला भर, यामुळे कम्युनिस्टांबद्दल एक प्रकारची आत्मीयतेची भावना मात्र आमच्या मनात जरूर होती. त्यामुळे कम्युनिस्टांवर सरकारने केलेला हल्ला, त्यांची चालू असलेली सर्रास धरपकड म्हणजे आम्ही ज्या ध्येयासाठी लढण्याचा प्रयत्न करत होतो त्याच्या मुळावरच घाव आहे असे आम्हाला वाटले. तसेच क्रांतिकारक चळवळीच्या लढ्यासाठी झटणाऱ्या प्रत्येक विभागाने ज्याची दखल घ्यायलाच पाहिजे इतकी ही महत्त्वपूर्ण घटना होती असे आम्हाला वाटले. आणि मग आम्ही या निर्णयाप्रत पोचलो की केवळ या अटकेचाच निषेध नव्हे, तर या देशातील सनदशीर लढ्यांचा बीमोड करण्यासाठी वाटेल त्या क्रूर मार्गांचा व दडपशाहीचा वापर करणाऱ्या साम्राज्यवाद्यांच्या धोरणाचाच निषेध केला पाहिजे.

यानंतर थोड्याच दिवसांनी मध्यवर्ती असेंब्लीत कामगार चळवळीविरुद्ध असलेले 'औद्योगिक तंट्यासंबंधीचे' एक विधेयक पास करण्यात आले होते. त्याला विरोध दर्शविण्यासाठी असेंब्लीच्या ज्या विभागात सरकारपक्षीय लोक बसत असत त्या ठिकाणी प्रेक्षकांच्या कक्षातून बॉम्ब फेकण्यात आले. भगतसिंग आणि दत्त यांना जागच्या जागी अटक करण्यात आली.

या खटल्याच्या सुनावणीच्या वेळी भगतसिंगने जे एक तेजस्वी निवेदन कोर्टापुढे सादर केले त्यावरून त्याच्या लिखाणाची तीव्रता किती होती हे सर्वांनाच जाणवले. भगतसिंगने आपण असेंब्लीत बॉम्ब टाकला ही गोष्ट अमान्य केली नाही. पण आम्हाला हे कृत्य का करावे लागले याची कारणमीमांसा मोठ्या जोरदारपणे कोर्टापुढे मांडली. भगतसिंग व दत्त यांना या गुन्ह्याबद्दल कोर्टाने जन्मठेपेची शिक्षा फर्मावली.

यानंतर लगेच आमच्या दुर्दैवाने लाहोरमधला आमचा बॉम्ब तयार करण्याचा कारखाना पोलिसांना सापडला. सुखदेव, किशोरी लाल व इतर बऱ्याच साथीदारांना पकडण्यात आले. आमच्यापैकी जयगोपाळ आणि हंसराज हे माफीचे साक्षीदार झाले. ह्याचा परिणाम म्हणजे पोलिसांना आमच्या आणखीही साथीदारांचा सुगावा लागला व आणखी धरपकडी झाल्या. थोड्याच आठवड्यात बिहार, उत्तर प्रदेश व पंजाबमधील आमचे बहुसंख्य क्रियाशील कार्यकर्ते पोलिसांच्या हातात सापडले. जे कॉम्रेड्स भूमिगत होण्यात यशस्वी झाले तेवढेच बचावले. मीसुद्धा भूमिगत होण्याची तयारी करत असतानाच पकडला गेलो.

या घटनेमुळे आमच्या डोळ्यांपुढे जणू अंधकारच पसरला. आमची क्रांतीची स्वप्ने, आमच्या सर्व आशा-आकांक्षा जवळ जवळ धुळीला मिळाल्या असे आम्हाला त्या वेळी तरी वाटले. पोलिसांच्या दडपशाहीपुढे आणि क्रूर छळवणुकीपुढे आमच्यापैकी सातजण टिकाव धरू शकले नाहीत आणि आमच्या मध्यवर्ती कमिटीचे दोन सभासद तर चक्क माफीचे साक्षीदार झाले, ही घटना आम्हाला अत्यंत विदारक आणि हादरा देणारीच होती.

## 'लाहोर कटा'च्या खटल्याची सुरुवात

१९२९च्या जुलै महिन्यात आम्हाला कोर्टात उभे करण्यात आले. आम्ही एकंदर तेराजण होतो. (आमच्या सहकाऱ्यांपैकी भगवानदास व सदाशिव आज कम्युनिस्ट पक्षाचे सभासद आहेत; त्यांना भुसावळला पकडून तेथेच दीर्घ मुदतीच्या शिक्षा देण्यात आल्या.). या खटल्याच्या निमित्ताने जेलमध्ये भगतसिंग आणि

दत्त यांची व आमची पुन्हा एकदा भेट झाली. ते मध्यवर्ती असेंब्लीत बॉम्ब टाकण्याच्या आरोपाखाली जन्मठेपेची शिक्षा भोगत होते. आमच्यावर चालू असलेल्या १९२९च्या 'लाहोर कटा'च्या खटल्यातही त्या दोघांना आरोपी म्हणून गोवण्यात आले.

जेलमध्ये शिरल्यानंतर आमची व भगतसिंगची जेव्हा भेट झाली तेव्हाची त्याची अस्थिपंजर शरीरयष्टी पाहून, आपल्या एका लाडक्या साथीदाराची जेलमध्ये काय दारुण अवस्था झालेली आहे असे वाटून आमच्या डोळ्यांत अक्षरश: आसवे आली. आम्ही पाहिलेला जुना भगतसिंग राहिलाच नव्हता. त्याच्या सुदृढ शरीरयष्टीबद्दल पार्टीत जो बोलबाला होता त्याचा जरासुद्धा मागमूस आता राहिला नव्हता. त्याच्या शरीराची नुसती सावलीच आमच्यापुढे उभी आहे असे आम्हाला वाटले. या परिस्थितीत त्याला स्ट्रेचरवर झोपवूनच कोर्टात आणण्यात येत असे.

त्याची ही परिस्थिती होण्याचे कारण काय होते? गेले कित्येक महिने पोलिसांनी त्याला अत्यंत पाशवी पद्धतीने वागवले होते. त्याची क्रूर छळणूक चालवली होती. सर्व राजकीय कैद्यांना निदान साधी माणुसकीची वागणूक मिळालीच पाहिजे या मागणीचा पाठपुरावा करण्यासाठी भगतसिंग व दत्त हे दोघेही अन्नसत्याग्रह करत होते आणि हेच त्यांच्या अतिशय खालावलेल्या शारीरिक परिस्थितीचे कारण होते.

आमच्या खटल्याला सुरुवात झाल्यानंतरचे पहिले तीन दिवस कोर्टात काय कामकाज चालले आहे याकडे आमचे मुळीच लक्ष नव्हते. खटल्याच्या बाबतीत आपले राजकीय धोरण काय असावे याची आपापसात चर्चा करण्यातच हा काळ निघून गेला. भगतसिंगची प्रकृती इतकी नाजूक झालेली होती की त्याला बसणेही जमत नव्हते, तरीही आरामखुर्चीत पडून तो चर्चेत हिरिरीने भाग घेत असे. या चर्चेच्या ओघात भगतसिंगने आमच्यावर प्रामुख्याने ज्या गोष्टी बिंबवण्याचा प्रयत्न केला त्या पुढीलप्रमाणे होत्या :

पहिली गोष्ट त्याने आमच्यापुढे अगदी ठासून आणि आग्रहाने मांडली ती ही की, या खटल्यामुळे आणि त्या निमित्ताने झालेल्या दडपशाहीमुळे क्रांतीचे आपले ध्येय व ते साकार करण्यासाठी लागणारी चळवळ अगदी भुईसपाट झालेली आहे असे मुळीच मनात आणू नका. या खटल्याच्या शेवटच्या निर्णयामधून आपल्या ज्या साथीदारांना वाचवणे शक्य असेल त्यांना वाचवण्याचा आपण जरूर प्रयत्न करू. परंतु सर्वसाधारणपणे खटल्याकडे बघण्याचा आपला दृष्टिकोन 'राजकीय प्रचार करण्याचे एक साधन' असाच राहिला पाहिजे. दुसरी

गोष्ट म्हणजे, या खटल्याचा आपण क्रांतिकारक मार्गाने उपयोग करून ब्रिटिश सत्तेचा 'न्यायदाना'चा मार्ग किती ढोंगी आहे हे साऱ्या जनतेसमोर प्रखर रीतीने मांडले पाहिजे. यामुळे आमच्यात निर्माण झालेला क्रांतिकारक चळवळीबद्दलचा आत्मविश्वास तिळमात्रही कमी करण्यात ब्रिटिश सत्तेला यश मिळणार नाही, असा आपल्या बचावाच्या धोरणाचा मध्यबिंदू असला पाहिजे. तिसरी गोष्ट त्याने सांगितली ती ही की, कोर्टापुढे निवेदने सादर करण्याच्या मार्गाने आपण सरकारशी लढा देऊच; पण त्याहीपेक्षा कोर्टात व तुरुंगातही राजकीय कैद्यांचे प्रश्न घेऊन, लढे करून आपण या जुलमी सत्तेला त्रस्त करीत राहिले पाहिजे. चौथी गोष्ट म्हणजे आपला खटला चालू असताना आपण जी धोरणे अवलंबणार आहोत व जे लढ्याचे मार्ग अवलंबणार आहोत त्यातून आपण ब्रिटिश सत्तेला व तिच्या पोलिसी दडपशाहीला किती कस्पटासमान मानतो आहोत हे जनतेच्या समोर स्पष्टपणे आणले पाहिजे. अशा रीतीने आपण सुरू केलेले जनजागृतीचे कार्य बाहेर आणि तुरुंगाच्या गजांच्या आडही चालू राहिले पाहिजे.

चर्चेच्या ओघात भगतसिंगने मांडलेल्या या स्पष्ट विचारांचा आम्हा सर्वांवर फारच परिणाम झाला. परिणामत: भगतसिंग व दत्त यांनी सुरू केलेल्या अन्नसत्याग्रहात आम्ही सर्वच सामील झालो. सर्व राजबंद्यांना एकाच 'वर्गात' ठेवले पाहिजे, त्यांना देण्यात येणाऱ्या अन्नात सुधारणा करण्यात आली पाहिजे व त्यांना लिहिण्या-वाचण्याच्या सोयी उपलब्ध झाल्या पाहिजेत अशा आमच्या मागण्या होत्या.

## अन्नसत्याग्रह

लाहोर कटाच्या खटल्यातील आरोपींनी सुरू केलेला प्रसिद्ध अन्नसत्याग्रह एकंदर ६३ दिवस चालला. आणि त्यात जतीन दास आपल्या प्राणाचे आत्मसमर्पण करून हुतात्मा झाले, या घटनेने देशातील लोकांमध्ये एकच खळबळ माजवून दिली. तिने लोकांच्या अंत:करणाचा अगदी ठाव घेतला.

अन्नसत्याग्रहाच्या सुरुवातीला जेल अधिकाऱ्यांनी त्याकडे फारसे गंभीरपणे लक्ष दिले नाही. थोड्याच दिवसांत आमच्यापैकी दोघांनी अन्नसत्याग्रह सोडून दिला. त्यामुळे सरकारला खात्री वाटू लागली की लवकरच बाकीच्यांचीही हीच गत होईल व अन्नसत्याग्रह बारगळून जाईल. ही गोष्ट खरी होती की, आमच्यापैकी बऱ्याच जणांना आपण अन्नसत्याग्रह बेमुदत चालवू शकू याबद्दल स्वत:ची खात्री देता येत नव्हती. माझ्या स्वत:बद्दल म्हणाल तर मी अन्नग्रहण केल्याशिवाय

किती दिवस काढू शकेन याची माझी मलाच खात्री नव्हती. आम्ही सगळे अडचणींना डरणारे नव्हतो हे खरे. पोलिसांच्या क्रूर वागणुकीला आणि छळाला आम्ही यापूर्वीही चांगले तोंड दिले होते. त्याचेही आम्हाला फारसे भय वाटत नव्हते. पण अन्नाशिवाय कित्येक आठवडे, कदाचित काही महिने, राहावे लागेल या कल्पनेने आमच्या अंगावर काटा उभा राहिला.

अन्नसत्याग्रहाच्या पहिल्या दहा दिवसांत फारसे काही घडलेच नाही. भूक खूप लागत होती व पोटात काहीच जात नसल्यामुळे अशक्तपणा वाढत होता. पहिल्या आठवड्यानंतर काही जणांना बिछान्यावर आडवे व्हावे लागले. अशा स्थितीत त्यांना कोर्ट चालू असताना बसून राहणे फारच अवघड जायचे. आतापर्यंत सवयीने अन्नसत्याग्रहाबद्दल वाटणारी पहिली भीती साफ निघून गेली होती. अन्नसत्याग्रह ही काही फारशी कठीण बाब नाही असेच आम्हाला वाटू लागले. पण अन्नसत्याग्रहातली खरी लढाई अजून पुढेच आहे याची मात्र आम्हाला कल्पना आलेली नव्हती.

अन्नसत्याग्रह मोडून टाकण्याच्या सरकारच्या कारवायांना दहा दिवसांनंतर सुरुवात झाली. तुरुंगामध्ये आम्ही वेगवेगळ्या स्वतंत्र खोल्यांत होतो. आम्हाला सक्तीने दूध पाजण्याचा त्यांचा प्रयत्न चालू होता. जेलचा डॉक्टर, त्याच्याबरोबर जेलचे पोलीस व खून-दरोडे घातल्याच्या आरोपाखाली शिक्षा झालेले जुने व चांगले तगडे कैदी अशा लव्याजम्यानिशी प्रत्येकाच्या खोलीत यायचे. आम्हाला पकडून जमिनीवर आडवे पाडण्यात यायचे. नाकातून एक रबरी नळी बळजबरीने पोटात टाकण्यात यायची आणि त्यातून दूध आत ओतण्याचा प्रयत्न व्हायचा. आम्ही सर्वांनी या पद्धतीविरुद्ध सुरुवातीला खूपच धडपड केली. पोलिसांशी करता येतील तेवढ्या झटपटी करून आमचा विरोध दाखवायचा प्रयत्न केला. पण त्याचा फारसा उपयोग होत नव्हता.

अन्नसत्याग्रहाच्या तेराव्या दिवशी रात्री माझ्या खोलीत बातमी आली की जतीन दासची प्रकृती फारच गंभीर झालेली आहे आणि त्याला हॉस्पिटलमध्ये हालविण्यात आलेले आहे. त्याच दिवशी संध्याकाळी माझी व जतीन दासची भेट झाली होती आणि त्या वेळी तर तो मला ठीक दिसला होता. मग एकदम त्याची प्रकृती का बिघडावी हे मला समजेना. जेलच्या एका साध्या शिपायाने मला ही बातमी पोचवली होती. त्याने जरा भीतभीतच मला सांगितले की पोटात सक्तीने दूध घालताना काहीतरी घोटाळा झाला आणि तेव्हापासून जतीन दास बेशुद्धावस्थेत आहे.

जतीन दासच्या आजाराची बातमी आम्हाला विजेचा जोरदार झटका बसावा तशीच धक्का देणारी होती. आमच्यापैकी बऱ्याच जणांची त्याच्याबरोबर तो तुरुंगात भेटेपर्यंत आधीची ओळख नव्हती. शांत आणि उगाच पुढे पुढे न करण्याच्या स्वभावाचा तो माणूस होता. त्याला गोष्टी सांगण्याची, चळवळीतले जुने किस्से ऐकवण्याची व तुरुंगाच्या रुक्ष वातावरणातही आपल्या विनोदी बोलण्याने सगळ्यांना हसत ठेवण्याची कला चांगलीच अवगत झालेली होती. त्यामुळे तो सर्वांचाच आवडता झालेला होता.

जतीन दासची ही बातमी समजल्याबरोबर मी फारच अस्वस्थ झालो. वेळ रात्रीची होती. खोल्यांना कुलुपे होती. खूप जोरजोरात आरडाओरड करून जेलरला आत बोलावून घेतले. त्याला खूप दमदाटी करून मला ताबडतोब जतीन दासला पाहायला हॉस्पिटलमध्ये नेण्यास भाग पाडले.

जेल-हॉस्पिटलमध्ये मला जे दृश्य दिसले ते फारच भयानक होते. डॉक्टर मंडळी त्याच्यावर उपचार करण्यात गुंतलेली होती. जतीन दास बहुतेक ही रात्र काही काढू शकणार नाही याची त्यांना भीती वाटत होती. या आजारातून तो जरा बाहेर आल्यासारखा वाटला पण ते तात्पुरतेच होते. तो इतका अशक्त झालेला होता की त्यानंतर त्याला न्युमोनिया झाला. अन्नसत्याग्रह चालूच असल्यामुळे औषध व आहार घेण्यास त्याने नकार दिला. त्याच्या या परिस्थितीनंतर मात्र सरकारने नाकातून नळी घालून सक्तीने दूध पाजण्याचा प्रयत्न केला नाही.

यानंतर आमच्या अन्नसत्याग्रहाला जरा गंभीर व तितकेच तीव्र स्वरूप प्राप्त झाले. दासनंतर शिव वर्माला हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. लवकरच जवळ जवळ सर्वजणांना हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. त्यामुळे खटल्याचे काम तात्पुरते बंद ठेवणे सरकारला भाग पडले. मृत्यूला पहिल्याप्रथम कोण सामोरा जातो याची आमच्यात अगदी स्पर्धाच सुरू झाली होती.

हॉस्पिटलमध्ये बळजबरीने दूध पाजून आमचा अन्नसत्याग्रह मोडून काढण्याची सरकारची खटपट चालूच होती. त्याला तोंड देण्यासाठी आम्ही नाना युक्त्या-प्रयुक्त्यांचे प्रयोग करून पाहिले. किशोरी लालने लाल मिरचीची पूड आणि उकळते पाणी पिण्याचा प्रयत्न केला. हेतू हा की असे केल्याने घशाला दुखापत होऊन सूज येईल व त्यामुळे बळजबरीने नळी पोटात टाकताना मनुष्य गुदमरून जाण्याची शक्यता असल्याने त्यांना तसे करणे धोक्याचे व अवघड जोईल. मी एका निराळ्याच युक्तीचा प्रयत्न केला. सक्तीने पोटात दूध टाकल्यानंतर लगोलग मी जिवंत माश्याच गिळून टाकायला सुरुवात केली, की ज्यामुळे

पोटात माश्या गेल्यानंतर आत गेलेले दूध आपोआपच ओकले जाईल. आमच्या या युक्त्यांचा सुगावा नंतर जेलच्या डॉक्टरांना लागल्यामुळे आमच्यावरचा पहारा त्यानंतर कडक करण्यात आला.

यानंतर आमचा अन्नसत्याग्रह मोडण्यासाठी सरकारने एक नवाच पण भयानक असा डाव रचला. आमच्या खोल्यांमधून पिण्याच्या पाण्याची जी मडकी ठेवण्यात येत असत ती काढून त्या ठिकाणी दुधाने भरलेली मडकी ठेवायला सुरुवात केली. एक दिवस रागाने दुधांच्या मडक्याकडे बघण्यात घालवला. पण तहान लागून जीव हैराण होतच होता. प्रत्येक वेळी मडक्यात पाणी असेल या आशेने मी मडक्याजवळ जायचो पण दूधच असलेले पाहून मस्तकात रागाची तिडीक भरायची. दूध नजरेस पडले की अगदी वेड्यासारखे व्हायचे. ज्या अधिकाऱ्याने ही दुष्ट योजना आखली तो जर माझ्यासमोर त्या वेळी आला असंता तर मी नक्कीच त्याचा खून केला असता. जेलच्या खोलीबाहेर एक शिपाई आमच्या हालचाली पाहण्यासाठी सतत शांतपणे उभाच असायचा. तहानेमुळे व घशाला पडलेल्या कोरडीमुळे मी किती वेळ•तग धरू शकेन या बाबतीत माझा माझ्यावरचाच विश्वास उडायला लागला होता. माझी खात्री झाली होती की आणखी काही तासांतच मी अन्नसत्याग्रह सोडून दूध पिऊन टाकणार. माझा घसा अतिशय कोरडा पडला होता. माझी जीभ सुजून गेली होती.

मी पहारा करणाऱ्या शिपायाला माझ्या खोलीच्या दरवाजासमोर बोलावले. मला कुठूनतरी फक्त दोन-चार थेंब तरी पाणी आणून दे अशी मी त्याला विनवणी केली. त्याने एकच उत्तर दिले, "मी तसे करू शकणार नाही. कारण मला तसा खास हुकूमच देऊन ठेवला आहे." मग मात्र माझा राग अनावर झाला. संतापाच्या भरात मी दुधाने भरलेले मडके हातात घेतले आणि ते दारावर दाणकन फेकून फोडून टाकले. शिपायाच्या अंगावर दुधाचा अभिषेकच झाला. तो पार घाबरून गेला; कारण त्याला मी वेडाच झालो आहे असे वाटले, आणि तसे वाटण्यात तो फारशी काही चूक करत होता असे मुळीच नाही!

माझ्या आजबाजूच्या खोल्यांतून बंद असलेल्या सर्व साथीदारांची हीच मानसिक स्थिती झालेली होती. नंतर मला समजले की किशोरी लाल आणि इतर सर्वांनीसुद्धा चिडून आपापल्या खोलीतील दुधाची मडकी दरवाजावर तशीच फोडून टाकली होती.

जेल-अधिकाऱ्यांनी हार खाल्ली. आमच्या प्रत्येकाच्या खोलीत परत पाण्याची मडकी ठेवण्यात आली. मी अधाशासारखे पाणी पीतच राहिलो. परिणाम

असा झाला की, मला कसेसेच वाटायला लागले व प्यायलेल्या पाण्याचा थेंबन्‌थेंब बाहेर पडला.

मध्यंतरीच्या काळात आम्हाला सहानुभूती दाखविण्यासाठी ज्या ज्या ठिकाणी राजकीय कैदी होते त्या त्या ठिकाणी अन्नसत्याग्रह झाले. आमच्या अन्नसत्याग्रहाला पाठिंबा देणारी जनआंदोलनाची लाटही साऱ्या देशभर पसरत होती. देशभर सर्वत्र आम्हाला पाठिंबा देण्यासाठी विराट सभा होत होत्या. याच वेळी मीरत कटाच्या आरोपाखाली तुरुंगात असलेल्या पुढाऱ्यांनीही याच हेतूने अन्नसत्याग्रह सुरू केला. त्यांच्या या लढ्याची बातमी साऱ्या जगभर वाऱ्यासारखी पसरली. भारतात राजबंद्यांना मिळणाऱ्या क्रूर वागणुकीकडे साऱ्या जगाचे लक्ष वेधण्यात आले. खुद्द इंग्लंडमध्ये तर या घटनेने फारच खळबळ उडाली.

आमचा अन्नसत्याग्रह चालू असताना आमच्या खटल्याच्या बाबतीत आपल्या साथीदारांशी विचारविनिमय करण्याच्या निमित्ताने; पण खरे म्हणजे अन्नसत्याग्रहामुळे आमची काय स्थिती झालेली आहे, तसेच आम्ही कितपत तग धरू शकू हे पाहण्यासाठीच भगतसिंग आमच्याकडे वारंवार भेटायला येत असे. स्वत: भगतसिंग अन्नसत्याग्रहाच्या ताणामुळे अगदीच अशक्त झालेला होता तरीही आम्हाला भेटायला आल्यावर जतीन दास व इतर सहकाऱ्यांजवळ बसून त्यांना उल्हसित करण्याचा प्रयत्न तो करीत असे. त्याच्या या अधूनमधून होणाऱ्या भेटींमुळे आमच्यात एक प्रकारचे चैतन्याचे वातावरण निर्माण व्हायला मदत व्हायची. त्याची परत केव्हा भेट होते याची आम्ही वाटच पाहायचो. शेवटी अशी परिस्थिती झाली की, जतीन दास मरणाच्या अगदी शेवटच्या पायरीवर येऊन पोचला होता. शिव वर्मा व इतर साथीदारही त्याच मार्गावर चालले होते. याच वेळी सरकारने अन्नसत्याग्रहाच्या बाबतीत आमच्याशी बोलणी करण्यास सुरुवात केली.

जेलच्या नियमात दुरुस्त्या सुचविण्यासाठी बिनसरकारी लोकांचे ज्यात मताधिक्य आहे अशा लोकांची एक कमिटी सरकारने नियुक्त केली. या कमिटीच्या सभासदांनी जेलमध्ये येऊन आमच्या भेटी घेतल्या व आमच्या जवळ जवळ सर्वच मागण्या मान्य होतील असे आश्वासन आम्हाला दिले. त्यांच्या या आश्वासनानंतरच आम्ही अन्नसत्याग्रह सोडण्याचा निर्णय घेतला.

जतीन दासची परिस्थिती फारच चिंताजनक झालेली होती. त्याला बोलता येत नव्हते व ऐकू येणेही बंद झालेले होते. तो जगेल अशी जरासुद्धा आशा राहिली नव्हती. आमचा विजय आमच्या अगदी दृष्टिपथात आलेला होता पण

तो मिळवून देण्यामध्ये ज्या आमच्या साथीदाराचा सिंहाचा वाटा होता तोच आमच्यात राहणार नव्हता. लढ्यातून मिळालेल्या विजयाचा आनंद त्याला अनुभवायला मिळणार नव्हता. तो मृत्युशय्येवर अगदी निपचीत पडला होता. आम्ही त्याचे सर्व साथीदार त्याच्या अवतीभवती होतो. मला ते दृश्य पाहवेना. माझ्या शक्तीबाहेरचे ते दृश्य होते.

जतीन दास शेवटी आम्हाला सोडून गेला. दु:खावेगाने खाली घातलेली मान जेव्हा मी वर केली तेव्हा अत्यंत निर्ढावलेल्या, एरवी कसलीही दयामाया न दाखविण्याऱ्या जेल-अधिकाऱ्यांच्या डोळ्यांतही मला अश्रू आलेले दिसले. जतीन दासचा मृतदेह जेव्हा बाहेर हजारोंच्या संख्येने जमा झालेल्या लोकांच्या हवाली करण्यासाठी जेलबाहेर आणण्यात येत होता, तेव्हा लाहोरच्या पोलिसांचा मुख्य अधिकारी—सुपरिंटेंडेंट हॅमिल्टन हारडिंग यालासुद्धा ब्रिटिश साम्राज्यवादी सत्तेच्या ताकदीपुढे हार न खाणाऱ्या हिंदुस्थानच्या या वीरापुढे आदराने आपली मान झुकवावी लागली.

अन्नसत्याग्रह सोडण्यासाठी आम्हाला सरकारने जी आश्वासने दिलेली होती त्यांचे नेहमीच्या सवयीप्रमाणे पालन तर झाले नाहीच; पण दिरंगाईच्या निषेधार्थ आम्हाला आणखी दोन वेळा परत अन्नसत्याग्रह करावा लागला. आणि त्यानंतर जे काही नियम करण्यात आले होते तेसुद्धा इतके अजब होते की, त्यातून मिळणाऱ्या मामुली फायद्यांतून बहुसंख्य राजबंद्यांना वगळण्यात आलेले होते. राजकीय कैद्यांना मिळत असलेल्या भयानक वागणुकीबद्दल (राजबंद्यांना आजच्या काळात मिळत असलेल्या वागणुकीच्या मानाने हजारपट वाईट वागणूक त्या काळात मिळत असे) जनता चांगलीच प्रक्षुब्ध झाली होती. 'कायद्याचे राज्य' करणारे म्हणून मिरवणाऱ्या ब्रिटिश सत्तेच्या तोंडावरचा बुरखा साफ फाडून टाकण्यात आला होता.

या अन्नसत्याग्रहाच्या काळात आमची सर्वांची अंत:करणे हेलावणारा असा एक संस्मरणीय प्रसंग घडला. त्या वेळी गदर पार्टीचे संस्थापक व १९१५-१६ सालच्या लाहोर कटाचे मान्यवर पुढारी सोहनसिंग भाकना आमच्या अन्नसत्याग्रहाच्या वेळी लाहोर जेलमध्येच शिक्षा भोगीत होते. त्यांना आधीच जन्मठेपेची शिक्षा झालेली होती. आतापर्यंत त्यांनी अंदमानात आणि हिंदुस्थानातल्या निरनिराळ्या तुरुंगांत मिळून १४ वर्षांची शिक्षा संपवलेली होती व जेलच्या नियमाप्रमाणे, कैद्याला मिळणाऱ्या शिक्षेच्या काळातील वार्षिक माफीचे दिवस धरून जी सूट मिळते त्या हिशेबाने, त्यांची लवकरच जेलमधून सुटका

होणार होती. या वयोवृद्ध क्रांतिकारकाने आमच्या अन्नसत्याग्रहाला स्वत: अन्नसत्याग्रह करूनच पाठिंबा द्यायचे ठरवले, त्या वेळी आमची अंत:करणे अक्षरश: हेलावून गेली. जेल सुपरिंटेंडेंटने आम्हाला ही बातमी दिली व आम्हाला असे आवर्जून सांगितले की, "त्यांच्या वयामुळे हा अन्नसत्याग्रह त्यांना घातक ठरण्याचा संभव आहे; शिवाय १४ वर्षे कारावासात काढल्यामुळे त्यांच्या प्रकृतीवर परिणाम झालेला आहे आणि मुख्य म्हणजे आता जर त्यांनी तुमच्या अन्नसत्याग्रहाला पाठिंबा दिला तर जेलच्या नियमाप्रमाणे त्यांना मिळणारे माफीचे दिवस आम्हाला रद्द करावे लागतील. म्हणजेच बाबांना आणखी एक वर्ष तरी उगाच तुरुंगात खितपत पडावे लागेल. यामुळे तुम्ही त्यांना भेटून या अन्नसत्याग्रहापासून परावृत्त करावे."

आमच्या सर्वांच्या वतीने भगतसिंगने बाबाजींची भेट घेतली; त्यांना अन्नसत्याग्रहापासून परावृत्त करण्याचा खूप प्रयत्न केला; पण त्याला यश आले नाही. डोळ्यांत अश्रू आणून बाबाजींच्या भेटीचा वृत्तान्त त्याने आम्हाला सांगितला. बाबाजींनी यानंतर आमचा अन्नसत्याग्रह संपेपर्यंत आपलाही अन्नसत्याग्रह चालूच ठेवला व या कृत्यामुळे त्यांना १ वर्ष जास्त तुरुंगात अडकून पडावे लागले.

## भगतसिंग आणि त्याचे विचार

सर्वसाधारण दहशतवादी पुढाऱ्यांची जी खास वैशिष्ट्ये होती त्यांचा मागमूसही भगतसिंगच्या स्वभावात नव्हता. विचारांच्या बाबतीत त्याचे आणि आमचे मतभेद होत नसत असे मुळीच नाही. आमच्या कित्येक सभा अत्यंत वादळी स्वरूपाच्या व्हायच्या. एकदाच नव्हे तर अनेकदा स्वत:ला मान्य नसलेल्या मार्गाचा अवलंब भगतसिंगने केलेला होता. केवळ बहुसंख्य साथीदारांच्या मताला मान देण्याकरिता. जोरदार इच्छाशक्ती व तापट स्वभावाच्या भगतसिंगमध्ये चंद्रशेखर आझादांच्या शांत व अविचल गुणांचा अभावच होता असे म्हटले तरी चालेल. त्यामुळे आपल्यापैकी कोणी साथीदार जरासा जरी कच खाऊ लागला आहे असे त्याच्या नजरेस आले की, तो त्याच्यावर इतका चिडायचा, चवताळायचा की काही विचारू नका; पण त्याचा एक असा महान गुणही होता की, आपल्या साथीदारांचा अवमान होईल असा शब्द त्याच्या तोंडून कधीही निघत असे. यदा कदाचित त्याच्या हातून तशी चूक झालीच तर त्याला इतके दु:ख व्हायचे, तो इतका ओशाळून जायचा आणि मग आपल्या हातून घडलेल्या चुकीची तो इतक्या मनापासून माफी मागायचा की, त्याच्याबद्दल कुणालाही जरासुद्धा राग यायचा नाही. त्याचा स्वभाव अत्यंत मनमिळाऊ होता. आजारी

साथीदारांबद्दल तो फारच प्रेम व आस्था दाखवत असे. तो जितका स्पष्टवक्ता होता, तितकाच विरोधी मते मनमोकळेपणाने ऐकून घेणारा होता. त्याच्या स्वभावात मानपानाच्या खुळचट कल्पनांचा जराही अवशेष दिसत नसे आणि म्हणूनच त्याचा ज्यांच्या ज्यांच्याशी संबंध आला त्या प्रत्येकाच्या प्रेमाला तो पात्र होत असे.

भगतसिंगला वाचनाचा खूपच नाद होता. तुरुंगातील अधिकाधिक वेळ त्याने समाजवादी वाङ्मय वाचण्यातच घालविला असे म्हटले तर ते चूक होणार नाही. जुन्या दहशतवादी पुढाऱ्यांसारखा त्याचा देवावर बिलकूल विश्वास नव्हता. तो कट्टर निरीश्वरवादी होता. तो कट्टर मार्क्सवादी होता असे म्हणणे जरा धाडसाचेच होईल; पण एक गोष्ट खरी की आमच्यामध्ये वारंवार होत असलेल्या चर्चेमुळे, तो स्वत: करीत असलेल्या समाजवादी वाङ्मयाच्या वाचनामुळे आणि मुख्यत: सोलापूर येथे झालेला उठाव, पेशावरमध्ये घडलेल्या घटना, तसेच चंद्रसिंगच्या नेतृत्वाखाली गढवाली सैनिकांनी घेतलेला शौर्यशाली पवित्रा या व अशाच घटनांमुळे त्याला एका गोष्टीची जाणीव नक्कीच झाली होती की दहशतवाद नुसता वैयक्तिक स्वरूपाचा असता कामा नये, तर त्याची सांगड सर्व जनतेच्या चळवळीशी घालणे अत्यंत आवश्यक आहे. इतकेच नव्हे तर दहशतवाद जनचळवळीचाच एक भाग असला पाहिजे व जनआंदोलनाच्या वाढीला मदत होईल असा त्याचा चळवळीत हिस्सा असला पाहिजे याचीही जाणीव त्याला झालेली होती.

तुरुंगात केलेल्या वाचनामुळे सोविएत युनियनबद्दल आम्हाला वाटत असलेल्या आपलेपणाच्या भावनांना जास्तच उधाण आले. १९३० साली 'ऑक्टोबर क्रांती'च्या वर्धापन दिनानिमित्त आम्ही आमच्या शुभेच्छा पाठवून सोविएत राज्याच्या शत्रूविरुद्ध त्यांनी चालवलेल्या लढ्याला आमचा पाठिंबा असल्याचे जाहीर केले.

## एकतर्फी निर्णय

या खटल्याच्या निमित्ताने साम्राज्यशाहीविरुद्ध जास्तीतजास्त प्रचार करण्याचे आमचे धोरण आम्ही खटल्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत तंतोतंत अमलात आणले. आमच्या या धोरणाचे जनतेत योग्य तेच पडसाद उमटले. खटल्याच्या कामकाजाच्या निमित्ताने आमच्या विचारांना प्रसिद्धीही खूप मिळाली. परिणाम व्हायचा तोच झाला! साम्राज्यवादी सत्ता अगदी पिसाळल्यागत झाली. आपच्यात

बेदिली माजावी, आमच्यातील एकी दुभंगावी यासाठी त्यांनी प्रयत्नांची शर्थ केली. आम्हीही काही कमी पडलो नाही. सरकारच्या कोणत्याही मानहानीकारक हुकुमांची अंमलबजावणी करायची नाही, कोर्टापुढे आणि पोलिसांपुढे जरासुद्धा नमते घ्यायचे नाही हाच आमचा पवित्रा कायम राहिला. त्यामुळे पोलिसांशी अनेक वेळा आमचे शारीरिक संघर्ष झाले व कोर्टाचे काम वारंवार बंद पडू लागले. आमच्या या प्रत्येक लढ्यातून साम्राज्यशाहीचे अत्याचारी नंगे रूप जनतेसमोर आणण्यात व आमच्या लढ्याला सहानुभूती निर्माण करण्यात आम्ही यशस्वी झालो.

९ महिने आमचा खटला मॅजिस्ट्रेटपुढे चालला. या काळात आमच्याविरुद्ध सरकार पक्षाकडून फारच थोड्या लोकांचे साक्षीपुरावे दाखल झाले होते. म्हणजे खऱ्या अर्थाने खटला नीट सुरूच झाला नव्हता आणि तोच सरकारने 'देशात असलेल्या आणीबाणीच्या परिस्थिती'च्या नावाखाली खटल्याचे काम एकदमच बंद करून टाकले. देशातील शांतता धोक्यात आहे असे निमित्त करून १९३० साली त्या वेळच्या व्हाईसरॉयने 'लाहोर कट खटला वटहुकूम १९३०' नावाचा एक वटहुकूमच जाहीर करून टाकला. या वटहुकुमाची कलमे कुणालाही कल्पना न करवण्याइतकी अजब होती.

आमच्यावरचा खटला एका खास कोर्टापुढे चालणार होता. कोर्टात आमच्या हजेरीची जरुरी नाही असे जर या खास कोर्टाला वाटले तर आमच्या गैरहजेरीतही आमच्याविरुद्ध खटला चालवण्याची मुभा या कोर्टाला वरील वटहुकुमान्वये देण्यात आलेली होती. आमच्या बचावासाठी एखाद्या वकिलाला किंवा आमच्या बाजूच्या साक्षीदारांना, एवढेच काय पण खुद्द आरोपीलाही, स्वत:चा बचाव स्वत:च करण्यासाठी कोर्टात उपस्थित होण्याची मनाई या वटहुकुमाद्वारे केलेली होती. या खास कोर्टालाच आम्हाला कसल्याही शिक्षा, अगदी फाशीची शिक्षासुद्धा, देण्याचा अधिकार दिलेला होता. या सर्वांवर कळस म्हणजे या कोर्टाकडून झालेल्या शिक्षेविरुद्ध अपील करण्याचा आमचा अधिकारही काढून घेतलेला होता. स्वत:ला थोडेतरी सुसंस्कृत समजणाऱ्या कोणत्याही सरकारने अशा तऱ्हेचा वटहुकूम काढल्याचा दाखला इतिहासात मिळणार नाही!

कोणत्याही आरोपीला योग्य तोच न्याय मिळवून देणारी आमची 'न्यायपद्धती' आहे याचा सतत डांगोरा पिटणाऱ्या ब्रिटिश सरकारला अशा तऱ्हेचा वटहुकूम आणून आमची सर्व बाजूंनी मुस्कटदाबी करण्याचा मार्ग का पत्करावा लागला? कारण अगदी उघड होते. क्रांतिकारक विचारसरणीचा प्रचार करण्यासाठी

आम्ही या खटल्याचा पुरेपूर उपयोग करून घेत आहोत याची त्यांना पूर्ण कल्पना आलेली होती. दुसरी एक गोष्ट त्यांना सतावत होती ती म्हणजे ब्रिटिश पोलीस अधिकारी सॉँडर्सला गोळ्या घालून ठार मारण्यात आले त्या वेळी त्याच्याबरोबर असलेला एकमेव इंग्रज पोलीस अधिकारी फार्ने ओळख परेडीमध्ये भगतसिंगला अचूक ओळखू शकला नव्हता. तसेच आमच्या खटल्याने लोकांमध्ये निर्माण केलेल्या प्रचंड आपुलकीच्या भावना व उत्साहामुळे सरकारच्या बाजूने तयार केलेले कित्येक महत्त्वाचे साक्षीदार सरकारच्या विरुद्ध चिडून उठले. आमच्यापैकी जे दोन माफीचे साक्षीदार होते त्यांनीही आपली निवेदनपत्रे मागे घेतली.

यामुळे नियमाप्रमाणे खटल्याचे कामकाज जर चालले असते तर सरकारच्या दृष्टीने कटाच्या खटल्याचा बोजवाराच उडून जाण्याचा धोका निर्माण झालेला होता.

वटहुकुमाप्रमाणे खास न्यायालयापुढे आमचा खटला सुरू होऊन एक पंधरवडा झाला नाही तोच लढाईला सुरुवात झाली. आम्ही कोर्टात प्रवेश करताना घोषणा देतो या सबबीखाली शिक्षा म्हणून यापुढे आमच्या हातात बेड्या घालून कोर्टात आणावे असा आदेश खास कोर्टाच्या अध्यक्षांनी जेल-अधिकाऱ्यांना दिला आणि आम्ही जेव्हा या खास कोर्टापुढे मत मांडले की, अशा प्रकारचे निर्बंध यापूर्वी मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात किंवा हायकोर्टात कधीही लादण्यात आलेले नव्हते, तेव्हा त्याकडे लक्ष देण्याऐवजी पोलिसांकडून आमच्यावर अत्याचार करण्यात आले.

कोर्टात हजर असलेल्या वकीलमंडळींच्या व प्रेक्षकांच्या डोळ्यांसमक्ष असंख्य पोलीस हातात दंडुके घेऊन आमच्यावर अक्षरशः तुटून पडले. जनतेवर अत्याचार करण्याचे काम शिकलेल्या पोलिसांचे हात जणू या हुकुमाची अंमलबजावणी करण्यासाठी शिवशिवतच होते. आमच्याजवळ कसलीच शस्त्रे नव्हती. हातानेच या हल्ल्याला तोंड देण्याचा प्रयत्न आम्ही केला; पण आमच्यावर चढाई करून आलेल्या पोलिसांची संख्याच इतकी प्रचंड होती की, आमचे काहीच चालू शकले नाही. छातीवर, पोटावर दंडुक्यांचे घाव पडत होते. आम्हाला अगदी जमिनीवर लोळवून दंडुक्यांनी व लाथांनी आमच्यावर सतत मारा चालू होता. कोर्टातून या रक्तबंबाळ अवस्थेतच आम्हाला सक्तीने जेलमध्ये हलविण्यात आले. आमचे काही साथीदार तर इतके जखमी झालेले होते की, पुढे काही दिवस त्यांना जागचे हालतासुद्धा येत नव्हते.

हातात बेड्या घालून कोर्टात हजर राहण्याचा जुलमी आदेश ताबडतोब

मागे घ्या अशी आम्ही मागणी केली. त्याकडे कोर्टाने फारसे लक्ष दिले नाही. या खास कोर्टाचे एकमेव भारतीय सभासद जस्टीस आगा हैदर यांच्या मनावर झालेल्या घटनांचा एवढा परिणाम झाला की, त्यांनी एका निवेदनाद्वारे स्पष्ट जाहीर केले की, 'राजबंद्यांच्या हातात बेड्या घालून कोर्टात उभे करावे व या आदेशाविरुद्ध निदर्शन करताच त्यांच्यावर अमानुष हल्ला करण्यात यावा, अशा हुकुमांशी मी कधीही सहमत नव्हतो.' अर्थातच लगेच खास कोर्टाच्या सभासदांची परत निवड करण्यात आली व त्यातून जस्टीस आगा हैदर यांचे नाव सोयिस्करपणे वगळण्यात आले.

असा हा खटला आरोपींच्याशिवाय, त्यांच्या वकिलांशिवाय, त्यांच्या बाजूच्या साक्षीदारांशिवाय चालू राहिला. तसेच शिक्षा फर्मावताना ज्याच्याशी ब्रिटिश सत्तेचे मतभेद होण्याची शक्यता होती अशा आरोपींना अमानुष वागणूक देण्याचे मान्य नसलेल्या एका हिंदी जजशिवाय खटल्याचे कामकाज पुढे चालू राहिले. न्यायदानाची थट्टा करणाऱ्या अशा या खटल्याचा निकाल काय लागणार हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट होते.

खास कोर्टात ५ महिने असे खटल्याचे नाटक करून ऑक्टोबर १९३० मध्ये खटल्याचा निकाल जाहीर करण्यात आला. भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांना फाशीची शिक्षा फर्मावण्यात आली. ७ जणांना जन्मठेपेची तर बाकीच्यांना लांब पल्ल्याच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. माझ्याविरुद्ध तीन माफीच्या साक्षीदारांनी दिलेल्या निवेदनपत्राखेरीज फारसा काहीच पुरावा नव्हता. यांपैकी एकाने तर आपले निवेदन नंतर मागेच घेतलेले होते. त्यामुळे सुटलेल्या मंडळींत माझा नंबर लागला. सुटल्यावर जेलच्या बाहेर पाऊल टाकून समोरच्या रस्त्यावर जेव्हा मी उभा राहिलो, तेव्हा आपल्या साथीदारांना एकटे टाकून चालल्याच्या जाणिवेने माझे मन अतिशय जड झाले.

आपल्या देशबांधवांच्या मनात भगतसिंग या माणसाला काय स्थान होते हे मला जेलबाहेर आल्यानंतरच खरोखर समजले. कोणत्याही सभेत 'भगतसिंग झिंदाबाद' याच घोषणेने वातावरण दुमदुमून जायचे. 'इन्किलाब झिंदाबाद'चा पहिला नारा भगतसिंगने उठवला होता. लाखोंच्या ओठाओठांवर भगतसिंगचे नाव होते; तर प्रत्येक तरुणाच्या हृदयात भगतसिंगचीच प्रतिमा ठसलेली होती. अशा माणसाशी प्रदीर्घ काळ आपला संबंध होता या भावनेने माझी छाती अभिमानाने फुगून जायची.

Acc. No. 124325

भगतसिंग व त्याच्या दोन साथीदारांना अजूनही आपण फाशीच्या शिक्षेपासून वाचवू शकू अशी आशा आमच्या मनात होती. सर्वांनाच असे वाटत होते की त्या वेळी चाललेल्या ब्रिटिश सरकारच्या व काँग्रेसच्या वाटाघाटीत काँग्रेस निदान त्यांना झालेली फाशीची शिक्षा रद्द करण्याची तरी अट पुढे मांडेल. पण आमची दारुण निराशा झाली. भगतसिंगला वाचवावे अशी जरी काँग्रेसची इच्छा असली तरी आम्ही सर्व हिंसक कृत्ये करण्याच्या आरोपाखाली असल्यामुळे त्यांनी 'गांधी-आयर्विन' कराराची ती एक अट म्हणून मांडली नाही.

एप्रिल १९३१मध्ये ज्या वेळी कराचीला काँग्रेसचे अधिवेशन होणार होते त्याच वेळी वयाच्या केवळ चोविसाव्या वर्षी भगतसिंगला फाशी देण्यात आली.

मी त्या वेळेस कराचीच्या काँग्रेस अधिवेशनासाठी जायला निघालो होतो. ज्या ज्या लोकांनी भगतसिंगला फाशी देण्यात आल्याचे ऐकले त्यांना अक्षरश: लहान मुलांसारखे ढसढसा रडताना मी पाहिले. मला या घटनेने इतका जबरदस्त धक्का बसला की माझी विचार करण्याची शक्तीच संपून गेली होती.

एखाद्या प्रज्वलित ताऱ्याप्रमाणे भगतसिंग राजकीय क्षितिजावर फारच थोडा वेळ चमकला; पण तो मावळला तेव्हा लाखोंच्या डोळ्यांतील एक भडकती ज्वाला होऊन मृत्यूचीही पर्वा न करता, साम्राज्यवादी जुलमी सत्तेची राखरांगोळी करून एका स्वतंत्र व जनतेच्या राज्याची—नवभारताची—निर्मिती करण्याची हिंमत आपल्याला देऊन गेला, यात तिळमात्र शंका नाही.

## चंद्रशेखर आझाद

१९२०-३०च्या दरम्यान दहशतवादी चळवळीकडे खेचले गेलेले तरुण क्रांतिकारक जनतेचे स्फूर्तिस्थान व अनेक दंतकथांचे केंद्रबिंदू बनले होते. या तरुणांतले प्रामुख्याने नजरेसमोर येणारे एक नाव म्हणजे चंद्रशेखर आझाद.

१९२५ साली काकोरी येथे दहशतवाद्यांनी रेल्वेवर केलेल्या हल्ल्यात चंद्रशेखर आझादने भाग घेतला होता. या घटनेनंतर झालेल्या धरपकडीतून तो निसटला होता. तो जर त्यात पकडला गेला असता, तर फाशीच्या शिक्षेशिवाय नक्कीच तो सुटला नसता. अशा परिस्थितीसुद्धा हा माणूस एक दिवसही थंडपणे बसायला तयार नव्हता. स्वत: अंगीकारलेल्या कार्यात त्याने जरासुद्धा खंड पडू दिला नव्हता. भगतसिंग व सुखदेव यांच्या मदतीने पार्टीची संघटना परत बांधण्याचे काम त्याने चालूच ठेवले.

चंद्रशेखर आझाद शारीरिक तसेच मानसिकदृष्ट्या इतका बलवान होता की, त्याला एक पोलादी पुरुष म्हटले तर वावगे होणार नाही. बऱ्याच गोष्टींच्या बाबतीत चंद्रशेखर आझाद आणि भगतसिंग यांच्या स्वभावात फरक होता. भगतसिंगच्या अंगी असलेला—एखाद्या प्रश्नावर एकदम डोके गरम करून घेण्याचा—अवगुण चंद्रशेखर आझादाच्या ठायी नव्हता. उलट, कोणत्याही कठीण प्रसंगी अतिशय शांत व थंड राहण्याची त्याला सवय होती. विशेषत: ज्या ज्या वेळी सशस्त्र उठावाची कामगिरी त्याच्याकडे असे त्या त्या वेळी तो अत्यंत शांत व संयमीपणे वागायचा. दिलेली कामगिरी बजावताना तो आपल्या मनाची जरासुद्धा चलबिचल होऊ द्यायचा नाही. परंतु भगतसिंगजवळ असलेली आपल्या एकंदर कार्याबद्दलची विशाल दृष्टी चंद्रशेखर आझादजवळ नव्हती. शिक्षणाची फारशी संधी न मिळाल्यामुळे चंद्रशेखर आझादजवळ भगतसिंगइतकी विद्वत्ताही नव्हती. त्यामुळे आमच्या कार्यकर्त्यांमध्ये त्या वेळी ज्या नवीन विचारसरणीचा उगम व्हायला लागला होता त्या आत्मसात करायला त्याला वेळ लागायचा. आमच्या पक्षाचे 'नौजवान भारत सभा' हे नाव बदलून 'हिंदुस्थान समाजवादी प्रजासत्ताक संघटना' असे ठेवले त्या वेळीही आम्ही तसे का केले याचा त्याने फारसा विचार केला होता असे दिसले नाही. त्याला लढा पाहिजे होता. इतर गोष्टींत त्याला फारसा रस नव्हता. पक्षाचे नाव बदलण्याला फारसा विचार न करता त्याने मान्यता देऊन टाकली.

चंद्रशेखर आझाद खऱ्या अर्थाने लढाऊ वृत्तीचा माणूस होता. लढ्याशिवाय तो अगदी बेचैन होत असे. त्याच्याकडे कितीही कठीण व धोक्याची कामगिरी सोपवली तरी त्याची आखणी करण्यात व कसल्याही अडचणींना न डगमगता ती पद्धतशीरपणे पार पाडण्यात त्याचा हातखंडा होता. त्याच्याइतक्या निधड्या छातीचा मनुष्य मी अजूनपर्यंत पाहिलेला नाही. शरीराने धट्टाकट्टा, स्नायू जणू लोखंडाचेच बनवलेले आहेत असे वाटावे इतके मजबूत आणि तितकाच चपळ असा हा इसम. या सर्वांवर कळस म्हणजे बंदुकीच्या नेमबाजीत त्याचा हात धरणारा आमच्या पक्षात तरी दुसरा कोणीच नव्हता.

पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार या प्रांतांत त्याचे कार्यक्षेत्र होते. त्यामुळे चंद्रशेखर आझादचे नाव कानावर आले तर या प्रांतातील पोलीस अधिकारी अक्षरश: चळचळ कापू लागायचे. राज्यसत्तेच्या अधिकाऱ्यांत एवढा दरारा कुणीही निर्माण केला नव्हता. भगतसिंगलाही हे जमले नव्हते. रक्तासाठी हपापलेला हा एक राक्षस आहे अशीच पोलिसांनी त्याची प्रतिमा तयार केली होती. हा अत्यंत खोडसाळ प्रचार होता. खरे तर आझाद अतिशय कनवाळू, आपल्या साथीदारांच्या

अडीअडचणींत मन लावून लक्ष देणारा, विनोदी वृत्तीचा व सदा आनंदी राहणारा असा एक सर्वसाधारण लोकांसारखाच मनुष्य होता. त्यामुळे आपल्या साथीदारांत तो अगदी लोकप्रिय तर होताच; पण त्याच्याकडे एक आदरणीय व्यक्ती म्हणून सर्वजण पाहत असत. कडक शिस्तपालनाचा तो एक आदर्शच होता. कोणाकडूनही, मग ती व्यक्ती कितीही मोठी असली तरी, किंवा स्वत:कडूनही जर एखादी चूक झाली तरी तो त्याबाबत प्रखरपणे टीका करायला मागेपुढे पाहत नसे. या त्याच्या वागणुकीमुळे त्याच्याकडून उगाचच कोणावरही अन्याय होत नसे. चंद्रशेखर आझादच्या बाबतीत एक गोष्ट अगदी पक्की ठरल्यासारखीच असायची. त्याच्यावर टाकलेली कोणतीही कामगिरी अगदी यशस्वीरीत्या पुरी होणारच. मला माहीत असलेला चंद्रशेखर आझाद हा असा साथीदार होता.

आम्ही तुरुंगात होतो आणि बाहेर चंद्रशेखर आझादने पोलिसांची अगदी धावपळ करून टाकली होती. १९२९च्या डिसेंबरमध्ये व्हाइसरॉय आपल्या खास गाडीतून जात असताना त्यावर बॉम्ब टाकण्यात आला. व्हाइसरॉय त्यातून कसाबसा मरता मरता वाचला. पोलिसांनी त्या वेळेस असा निष्कर्ष काढला की, जोपर्यंत चंद्रशेखर आझाद जिवंत आहे तोपर्यंत परिस्थिती अशीच गंभीर आणि धोकादायक असेल. चंद्रशेखर आझादला पकडण्यासाठी सरकारने फारच लांबवर जाळे पसरून ठेवले होते. पण हा बहाद्दर पोलिसांच्या हातावर तुरी देऊन चक्क लाहोरमध्ये येऊन धडकला.

आम्ही त्या वेळी लाहोरच्या तुरुंगात बंद होतो. आमच्या सुटकेचा धाडसी प्रयत्न करण्याचा आराखडा डोक्यात घेऊनच चंद्रशेखर आझाद लाहोरला पोचला होता. आम्हाला जेलमधून कोर्टात नेताना पोलिसांच्या गाडीवर हल्ला करून आमची सुटका करण्याचा त्याचा बेत होता. पण रस्त्यात ठेवलेल्या बॉम्बचा अवेळीच स्फोट झाल्यामुळे त्याचा बेत यशस्वी झाला नाही. या घटनेनंतर तो जवळ जवळ पोलिसांच्या हातात सापडलासुद्धा होता. पण तिथेही शिताफी करून त्याने परत गुंगारा दिला. त्यानंतर पोलिसांनी चंद्रशेखर आझादबद्दल ऐकले ते दिल्लीत झालेल्या आणखी एका सशस्त्र हल्ल्यानंतरच! त्यानंतर पंजाबमधील बऱ्याच जिल्ह्यांत बॉम्बस्फोटांच्या मालिकेला सुरुवात झाली. यात अनेक पोलीस अधिकारी भयंकर जखमी झाले आणि कित्येक ठारही झाले. दिल्लीतल्या घटनेमुळे व त्यानंतर लाहोर कटाच्याच खटल्याच्या निमित्ताने धरपकडीच्या सत्रात शेकडो कार्यकर्ते पकडले गेले. पुन्हा एकदा चंद्रशेखर आझाद पोलिसांना चुकवण्यात यशस्वी झाला. चळवळीवर सरकारचा जोरदार हल्ला चाललाच होता. बऱ्याच

ठिकाणी आमचा पराभव झाला. बऱ्याच लढ्यांतून आम्हाला माघार घ्यावी लागली. वेळ फारच कठीण होती. जिवंत किंवा मृत अवस्थेत चंद्रशेखर आझादला जो कोणी आणून देईल त्याला हजारो रुपयांचे बक्षीस ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी लावले होते. तरीही हा आमचा शूर साथीदार जरासुद्धा डगमगला नाही.

१९३० साली मी जेव्हा तुरुंगातून बाहेर आलो, त्या वेळेस चंद्रशेखर आझादची व माझी परत भेट झाली. आपल्या ध्येयाच्या बाबतीत पूर्वीइतकाच तो निर्भय होता. चळवळीच्या धकाधकीतून मिळणाऱ्या थोड्याफार वेळात त्याने राजकीय अभ्यास करायला सुरुवात केलेली होती. त्याची राजकीय समज आता खूपच प्रगल्भ झालेली होती. त्याला इंग्रजी चांगले वाचता येत नसे. त्यामुळे इंग्रजीतील समाजवादी वाङ्मय तो दुसऱ्या कुणाकडूनतरी वाचून घेऊन त्यांच्याकडून नीट समजावून घेत असे. सोविएत युनियनबद्दल त्याच्या मनात फारच प्रेम निर्माण झालेले होते. आपल्या कार्यकर्त्यांना शिक्षणासाठी आणि क्रांतिकारक चळवळीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी सोविएत युनियनला पाठवले पाहिजे अशी त्याची इच्छा होती.

अपयशांनी तो कधीच खचला नव्हता; तरीही काँग्रेस व ब्रिटिश सरकारमधल्या समझोत्याच्या बातम्या उठत होत्या आणि परिस्थिती आम्हाला हवा तसा आकार घेत नव्हती हे आझादला व पार्टीतल्या इतरांना स्वच्छ दिसत होते. आझाद व त्याच्या साथीदारांच्या नि:स्वार्थी लढ्यानंतर, त्यांनी झेललेल्या इतक्या घावांनंतरही राष्ट्रीय चळवळ क्रांतिकारक मार्गाकडे वळलेली नव्हती. पेशावर, सोलापूर व चित्तगावमधल्या घटनांकडे पाहून आमच्या हृदयात जे आशेचे अंकुर फुटत होते ते तसेच अपूर्ण गाडलेले राहिले.

या सर्वांमुळे आझादला खोल आणि दूरवर विचार करणे भाग पडले. त्याचा दहशतवादावरचा विश्वास उडाला होता असे मुळीच नाही; पण केवळ एखादा शौर्यशाली व त्यागी तरुणांचा गट त्यांच्या दहशतवादी कृत्यांनी पूर्ण राष्ट्रीय चळवळ क्रांतीच्या दिशेने नेऊ शकेल या विचारात काहीतरी चूक होते आहे हे त्याला साफ दिसू लागले होते. भगतसिंगला याबाबत काय वाटत होते, कार्य कसे करावे याबद्दल आमच्या तुरुंगात काय काय चर्चा झाल्या होत्या, याबद्दल जाणून घ्यायची त्याला तीव्र इच्छा होती.

चंद्रशेखर आझादचे स्वत:चे मत तर असे झाले की, आपल्यातल्या जास्तीतजास्त साथीदारांनी यापुढे कामगार व शेतकऱ्यांना राजकीयदृष्ट्या संघटित करण्यासाठी धडपडले पाहिजे, त्याच्यातून समाजवादी चळवळीचा उगम व्हायला

पाहिजे आणि ज्या वेळी सर्व जनआंदोलनांना सशस्त्र उठावाची साथ पाहिजे असेल ती देण्यासाठी सशस्त्र दलाची उभारणी केली पाहिजे.

चंद्रशेखर आझादला अशी पार्टीची पुनर्रचना व्हावी असे वाटत होते; पण दुर्दैवाने त्याचा हा मनोदय प्रत्यक्षात आणण्यासाठी तो फार दिवस जिवंत राहू शकला नाही. एका नतद्रष्ट देशद्रोह्याने खबऱ्याचे काम केल्यामुळे अलाहाबादच्या आल्फ्रेड पार्कमध्ये तो बसला असताना चोहोबाजूंनी बंदूकधारी पोलिसांनी त्याला गराडा घातला. अशा परिस्थितीतही त्याने शरणागती पत्करली नाही. आपल्याजवळच्या पिस्तुलाने त्याने बराच वेळ लढण्याचा प्रयत्न केला. या चकमकीत दोन पोलीस अधिकारी गंभीरपणे जखमी झाले. शेवटी पोलिसांच्या गोळीने डाव साधला आणि चंद्रशेखर आझाद मारला गेला.

अशा रीतीने आयुष्यभर अंगीकारलेल्या सशस्त्र लढ्याच्या मार्गावर लढत लढतच या अत्यंत शूर आणि पोलादी पुरुषाचा अंत झाला. आजही त्याच्या शौर्याचे पोवाडे मोठ्या आदराने उत्तर प्रदेशातील जनता गाताना आपल्याला दिसून येईल.

## अजूनही तुरुंगातच

भगतसिंगबरोबर लाहोर कटाच्या खटल्यात असलेल्या आमच्या सात साथीदारांना जन्मठेपेच्या शिक्षा झाल्या होत्या. त्यांच्यापैकी महावीरसिंगने अंदमानमध्ये शिक्षा भोगत असताना तिथे झालेल्या पहिल्या अन्नसत्याग्रहात भाग घेऊन आपल्या प्राणांची आहुती दिली. किशोरी लाल, जयदेव, शिव वर्मा व गया प्रसाद अजूनही तुरुंगातच आहेत. या प्रत्येकाने साडेसोळा वर्षे तुरुंगात घालवली आहेत. त्यांचा तुरुंगातला हा काळ वारंवार कराव्या लागलेल्या लढ्यांनी व राजबंद्यांच्या मागण्यांसाठी केलेल्या अन्नसत्याग्रहांनी ओतप्रोत भरलेला आहे. तुरुंगातल्या या काळात त्यांनी समाजवादी दृष्टिकोनाचा एकाग्रतेने अभ्यास करून आपल्या विचारांमध्ये परिपक्वता प्राप्त करून घेतली आणि त्याची परिणती त्यांनी कम्युनिझमचा स्वीकार करण्यात झाली.

अंदमानमध्ये या दोस्तांनी जो एक मोठा अन्नसत्याग्रह केला होता त्या वेळी राष्ट्राच्या सर्व पुढाऱ्यांनी त्यांच्या सुटकेच्या प्रयत्नांची पराकाष्ठा करू असे आश्वासन दिलेले होते. आठ वर्षे झाली तरी हे आश्वासन त्यांनी पूर्ण केलेले नाही.

साऱ्या देशाला गौरव वाटावा अशा योग्यतेची ही माणसे आहेत. ज्या वेळी माणसाच्या आयुष्याला खरी सुरुवात होते अशा कोवळ्या वयातच आयुष्यातल्या सर्व चांगल्या व आनंददायी गोष्टींचा त्याग करून ही मंडळी चळवळीत शिरली. साम्राज्यशाहीच्या जुलमी सत्तेखाली आपली जनता दबलेली असताना सशस्त्र उठाव करून, न डगमगता फासावर जाण्याच्या तयारीने, जनतेला निष्क्रियतेतून, अगतिकतेतून हालवून टाकण्यासाठी व त्यातून देशबांधवांना ब्रिटिश सत्तेविरुद्ध उठवण्यासाठी या व्यक्तींनी क्रांतिकार्याचा हा मार्ग स्वीकारला होता. या त्यांच्या गुन्ह्याबद्दल त्यांनी आपल्या आयुष्याची साडेसोळा वर्षे तुरुंगात घालवून जी सजा भोगली ती शिक्षा का कमी आहे? ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावर त्यांना तुरुंगाच्या चार भिंतींत डांबण्यात आले. आज ही सारी मंडळी मध्यम वयाची आहेत. आपल्या आयुष्याची मौल्यवान वर्षे अंदमान व हिंदुस्थानातील इतर स्मशानवत तुरुंगात घालवून ती अकाली म्हातारी होऊ लागलेली आहेत. त्यांच्यापैकी एकजण तर क्षयाने अत्यवस्थ आहे.

चोर, खुनी, डाकूसारख्या गुन्हेगारांना, ज्यांचा अशी कृत्ये करण्यामागचा हेतू अगदी हीन पातळीचा असतो त्यांनाही, जन्मठेपेच्या शिक्षेतून १४ वर्षांनंतर तुरुंगाच्या बाहेर सुटून येता येते. पण आमचे हे साथीदार, ज्यांच्याविरुद्ध सशस्त्र उठावात भाग घेतला असा आरोपही पोलिसांनी ठेवला नव्हता, ज्यांना खास वटहुकुमाने निघालेल्या अजब कोर्टाने त्यांच्या गैरहजेरीत खटल्याचे नाटक करून सजा केलेली होती, त्यांना एवढेही स्वातंत्र्य मिळू नये ही किती नामुष्कीची गोष्ट आहे.

त्यांचा खरा गुन्हा हा आहे की, त्यांनी अंगीकारलेल्या ध्येयवादावरचा त्यांचा विश्वास अजून कायम आहे. सरकारची तशीच इच्छा असेल तर ते तसेच तुरुंगात राहतील, कदाचित तिथेच मरतीलही; पण लाचारीने कोणापुढेही आपली मान झुकवणार नाहीत!

## किशोरी लाल

आम्हाला लाहोर कटाच्या खटल्यात अटक झाली, त्या वेळी किशोरी लालची आणि माझी पहिली ओळख झाली. तो दिवसही मला नीट आठवतोय. १० जुलै १९२९. ती सकाळची वेळ होती. आम्हा कच्च्या कैद्यांना कोर्टात हजर करण्यासाठी जेलच्या दरवाजापाशी आणण्यात आले होते. या खटल्यात आम्हाला शिक्षा होणार यामुळे नव्हे, तर आमच्या पक्षाची या धरपकडीमुळे

जी भयानक मोडतोड झालेली होती त्यामुळे कोर्टात जाताना आमची अंत:करणे अगदी जड झालेली होती. अशा वेळी दरवाजापाशी आम्हाला किशोरी लाल दिसला—खट्याळ हसू चेहऱ्यावर असणारा, अंगाने बुटका पण काटक आणि आपल्या मिशीला वारंवार पीळ देणारा (यामुळे आपण रुबाबदार दिसतो असे हसत हसत नंतर आम्हाला त्याने सांगितले.) हा इसम. त्या गंभीर परिस्थितीत आम्हाला त्याचे हसू जरा विचित्रच वाटले; पण त्याचा तो स्वभावच होता.

काहीही घडले तरी, गोष्टी कितीही वाईट थराला गेल्या तरी त्याला त्यातूनही काहीतरी विनोद निर्माण करता येत असे. तो अगदी मनमोकळा होता. जेलमधल्या लढ्यांच्या व अन्नसत्याग्रहाच्या काळ्या निराश दिवसांतही त्याच्या विनोदांनी आम्हा सर्वांची हसून हसून मुरकुंडी वळायची.

कोर्टात कामकाज चालू असताना एखाद्या वकिलाच्या, मॅजिस्ट्रेटच्या किंवा पोलीस अधिकाऱ्याच्या दिसण्यातला गमतीदारपणा हा नेमका टिपायचा आणि त्याच्यावर काहीतरी खास विनोद करून आपल्या साथीदारांमध्ये हळूच पुटपुटायचा. आणि मग कोर्टात एकच खसखस पिकायची. यामुळे कोर्टाच्या कामात अडथळे आले की या आमच्या पोरकट वागण्याबद्दल आमचे वकीलही आम्हाला तंबी द्यायचे. आम्ही किशोरी लालला 'बाबा रे, परत असले विनोद इथे कोर्टात तरी करू नकोस' असे बजावले तर हा हिरमुसला होऊन इतके लांब तोंड करून बसायचा, की ते पाहूनही आम्ही हसायला लागायचो.

आम्ही त्याचे विनोद ऐकून नुसतेच हसत होतो असे नाही, तर कधी कधी आमच्यावरही त्याच्या विनोदाचा विषय होण्याचे प्रसंग यायचे. यातून लहान, मोठा, तरुण, म्हातारा कुणीही सुटत नसे. एक मात्र होते की, त्याच्या या वैयक्तिक विनोदात उपहास नसायचा. त्यामुळे कुणालाच त्याचे काही वाटायचे नाही. उलट ज्या माणसावर तो विनोद करायचा तोच सर्वांत जास्त हसत असे.

बाहेरून इतका हसरा व मिश्कील दिसणारा किशोरी लाल आतून एक जबरदस्त निष्ठावान आणि कणखर मनाचा माणूस होता. त्याचे अंत:करण किती कोमल होते याचाही मला अनुभव आला. लाहोरच्या मध्यवर्ती तुरुंगात आणण्यापूर्वी पोलिसांनी त्याला लाहोर किल्ल्यात डांबून ठेवले होते. आमच्या पक्षाबद्दलच्या गुप्त बातम्या त्याच्याकडून मिळविण्यासाठी त्याच्यावर पोलिसांनी अनन्वित अत्याचार केले. परंतु अगदी पंजाब पोलिसांनासुद्धा समजून चुकले की, आपल्या अत्याचारांना भीक न घालणारा, शेराला सव्वाशेर असा इसम आपल्या समोर उभा आहे. पोलिसांनी वैयक्तिक अत्याचारांची पराकाष्ठा केली,

पण या माणसाच्या तोंडून हसण्यापलीकडे कोणतेही उत्तर मिळाले नाही.

१९३०च्या जून महिन्यात घडलेल्या एका घटनेचा इथे उल्लेख करणे जरुरीचे आहे. काँग्रेसच्या नेतृत्वाखाली साऱ्या देशभर कायदेभंगाची चळवळ सुरू झाली होती. काँग्रेसच्या असंख्य राजबंद्यांना आमच्या तुरुंगातच आणून ठेवले होते. त्यांच्यात तरुणांचा प्रामुख्याने भरणा होता. आमचा संपर्क त्यांना होऊ नये याची दक्षता अर्थातच तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनी अगदी कटाक्षाने घेतली होती. आम्हाला एका बाजूच्या वेगळ्या बाराकीत ठेवण्यात आले होते.

आम्हाला माहिती मिळाली की काँग्रेसच्या या राजबंद्यांचे तुरुंगात फारच हाल होत आहेत. वेळप्रसंगी त्यांना मारहाणही होत होती. या राजबंद्यांना आपल्याला कशी मदत करता येईल याबद्दल आमच्या आपापसात चर्चा होत; पण खास वॉर्डर्सचा आणि शिपायांचा कडक बंदोबस्त असल्यामुळे आम्ही हतबल झालो होतो. आम्हाला त्यांच्याकडच्या बातम्या समजायच्या पण त्या घटना घडून गेल्यानंतर. आम्ही काही करायचे ठरवावे तर लगेच नवीनच बातमी हाती यायची.

त्यांच्यामधील आणि आमच्यामधील ही कोंडी फोडायचीच असा निश्चय किशोरीने केला. त्याच्या युक्तिबाजपणामुळे आणि हसून मैत्री करण्याच्या हातोटीमुळे वॉर्डर शिपायाकडून त्याने एक बातमी काढली. त्याच दिवशी एका काँग्रेस कार्यकर्त्याला पोलिसांनी बेदम मारले होते इतकेच नव्हे, तर त्याच्या हातापायांत दंडाबेडीही घातली होती. ताबडतोब आमची सभा झाली. या घटनेच्या बाबतीत जेल सुपरिंटेंडेंटकडे नुसती तक्रार करून काहीही झाले नसते. त्याने कानावर हात ठेवून आम्हाला ती बातमी खोटी आहे, असे काही झालेलेच नाही, असेच सांगितले असते. ताबडतोब किशोरीने आपली योजना मांडली.

योजना अशी होती : आमच्या बराकीच्या भोवती असलेल्या भिंतीवरून चढून जाऊन ज्या कोठडीत काँग्रेसच्या त्या राजबंद्याला दंडाबेडी घालून ठेवले होते तिथे धडकायचे. हे करताना कुणी आडवा आला तर त्याला धक्के मारून हटवायचे. त्या काँग्रेस कार्यकर्त्याच्या खोलीसमोर उभे राहून तुरुंगाचे सुपरिंटेंडेंट येईपर्यंत घोषणा देत उभे राहायचे. राजबंद्यांना अशा प्रकारची मारहाण करून त्यांच्या हातापायांत दंडाबेडी घालणे हे अनधिकृत कृत्य आहे आणि म्हणून असल्या घटना ताबडतोब थांबवल्याच पाहिजेत अशी मागणी करायची. तशी ही योजना धाडसाची आणि धोक्याचीच होती, पण प्रयत्न करून पाहण्यासारखी होती.

आमच्या अपेक्षेप्रमाणे सर्व गोष्टी झाल्या. जेलचे शिपाई व वॉर्डरलोक आम्हाला आमच्या कोठ्यांबाहेर पाहून क्षणभर गोंधळलेच. त्यांनी आम्हाला अडवण्यासाठी थोडीफार धडपड केली; पण घटना इतक्या वेगाने होत होत्या की त्याचा काहीच उपयोग झाला नाही. काही क्षणांतच आम्ही त्या राजबंद्याच्या खोलीसमोर पोचलो आणि झालेल्या प्रकाराची खरीखुरी माहिती आम्हाला समजली.

एवढे होईपर्यंत तुरुंगातली धोक्याची घंटा जोरजोरात वाजत होती. सगळीकडे बातमी पसरली. 'बॉम्बकेसच्या कैद्यांनी' बंड पुकारले आहे. बरोबर वॉर्डर लोकांची मोठी कुमक घेऊन घटनास्थळी जेलर हजर झाला. त्यांनी आमच्यावर दंडुक्यांनी हल्ला केला. त्यांची संख्या इतकी जास्त होती की आमच्या विरोधाचा काहीही उपयोग झाला नाही. आमच्यापैकी बरेचजण जखमी झाले. किशोरीही चांगलाच जखमी झाला होता. ही चकमक अशीच आणखी थोडा वेळ चालू राहिली तर सारा जेलच सरकारच्या विरुद्ध बंड करेल या भीतीने जेल-अधिकाऱ्यांनी परिस्थिती फारशी चिघळू दिली नाही.

एका तासानंतर आमच्या बराकीत येऊन सुपरिंटेंडेंटने आमची भेट घेतली. काँग्रेस राजबंद्याच्या मारहाणीची चौकशी केली जाईल आणि असले प्रकार परत होणार नाहीत याची दक्षता घेतली जाईल असे आश्वासन त्याने आम्हाला दिले व कायदा तुमच्या हातात घेण्याचा प्रयत्न मात्र करू नका अशी विनंती केली. जेल-अधिकाऱ्याने दिलेल्या आश्वासनामुळे परिस्थिती थोडा काळ नक्कीच सुधारली. किशोरी लाल - त्या नाट्यपूर्ण दिवसाचा नायक झाला.

किशोरीला जन्मठेपेची शिक्षा झाली होती. आज या क्षणापर्यंत तो पूर्वीइतकाच हसतमुख व तीव्र निष्ठावंत आहे. त्याच्या हसऱ्या व मनमोकळ्या स्वभावामुळे त्याचा ज्यांच्याशी संबंध येतो त्यांच्याशी त्याची चांगलीच मैत्री होते. कारावासातल्या वेळेचा उपयोग त्याने क्रांतिकारक वाङ्मयाचा अभ्यास करण्यात व्यतीत केला आणि त्याचा कम्युनिझमच्या तत्त्वप्रणालीवरचा विश्वास दृढ झाला.

साम्राज्यवाद्यांचे हस्तक, सरकारी अधिकाऱ्यांचे बूटचाटे व पंजाबमधील साठेबाज-जमीनदार यांच्या अग्रभागी असणारा पंजाबचा 'सैनिक पंतप्रधान' या सर्वांना हे पक्के ठाऊक झालेले आहे की, पंजाबमधला दणकट शेतकरी वर्ग ज्याच्या झेंड्याखाली वाढत्या संख्येने जमा होत आहे तो कम्युनिझम आपला महाभयानक शत्रू आहे. या सत्ताधाऱ्यांवर मोठा दबाव आणल्याशिवाय ते कधीही किशोरीला मुक्त करणार नाहीत.

## शिव वर्मा

लाहोर कटाच्या खटल्यात गोवल्या गेलेल्या साथीदारांमध्ये शिव वर्मा हा सर्वात अभ्यासू लोकांपैकी एक होता. तो जेलबाहेर चाललेल्या घडामोडींबद्दल व क्रांतिकारक चळवळीबद्दल खूपच गंभीरपणे विचार करायचा. आम्हाला ठाऊक होतेच आणि त्याला तर आमच्यापेक्षाही अधिक ठाऊक होते की, त्याला कमीतकमी जन्मठेपेची शिक्षा तरी नक्कीच झाली असती, त्याला फाशीची शिक्षा होण्याचीही शक्यता होती. कारण तो उत्तर प्रदेशातल्या पार्टीचा प्रमुख संघटक व मध्यवर्ती कमिटीचा सभासद होता. या खटल्यात गोवलेल्या सर्व मध्यवर्ती समितीच्या सभासदांना फाशीची शिक्षा देण्यात येईल, असे खटल्याच्या अगदी सुरुवातीलाच आम्हाला कळवण्यात आले होते. तरीही तो त्याच्या अभ्यासात व्यग्र असायचा हे आम्हाला चमत्कारिक वाटायचे आणि याबद्दल आम्ही त्याची टिंगलही करायचो. अभ्यासाव्यतिरिक्त शिव वर्माचा आवडता व्यासंग म्हणजे बुद्धिबळाचा खेळ आणि तो त्यात चांगलाच तरबेज होता.

मी शिवला बऱ्याच वेळा या खटल्याआधी भेटलो होतो; पण पक्षाच्या त्या वेळच्या नियमाप्रमाणे मी त्याच्या गतेतिहासाबद्दल काहीच विचारले नव्हते. तरीही मला त्याच्याबद्दल अनेकदा कुतूहल वाटायचे. अत्यंत किडकिडीत व नाजूक शरीराचा, अकाली केस पांढरे झालेला व अत्यंत शांत स्वभावाचा हा माणूस होता. आपण बोलत असलेला प्रत्येक शब्द मोजूनमापून बोलावा तसा हळू व सावकाश बोलायची त्याला सवय होती. आमच्या क्रांतिकारक चळवळीत हा माणूस कसा काय सामावून जाईल असे आम्हाला वाटायचे. आम्हाला जेव्हा समजले की बॉम्ब आणि पिस्तुलांशी खेळ करणाऱ्या पार्टीचा तो एक चांगला क्रियाशील कार्यकर्ता आहे, तेव्हा क्षणभर त्यावर आमचा विश्वासच बसेना.

उत्तर प्रदेशामधल्या हरदोई जिल्ह्यात १९०६ साली त्याचा जन्म झाला. वयाच्या पंधराव्या वर्षीच त्याने राजकारणात प्रवेश केला. आपला अभ्यास सोडून १९२१च्या असहकारितेच्या व कायदेभंगाच्या चळवळीत त्याने सक्रिय भाग घेतला. ही चळवळ संपल्यानंतर समाजकार्यात लक्ष घालायला त्याने सुरुवात केली व आपला अभ्यासक्रम परत चालू ठेवला. १९२५ साली तो कानपूरमध्ये आला व त्याच ठिकाणी तो क्रांतिकारकांच्या गुप्त संघटनेत ओढला गेला. या संघटनेत त्याचे कार्य इतके उत्कृष्ट होते की थोड्याच दिवसांत त्याचे कॉलेज म्हणजे आमच्या चळवळीचा एक भक्कम अड्डाच झाला.

१९२५ साली 'काकोरी कटा'च्या खटल्यामध्ये झालेल्या धरपकडीमुळे

दहशतवादी चळवळीचे बरेच जुने पुढारी पकडले गेले. चळवळ पुढे नेण्याचा सारा भार तरुणांवर आणि खास करून अजून पकडल्या न गेलेल्या विद्यार्थ्यांवर पडला. या विद्यार्थ्यांपैकी बहुसंख्य विद्यार्थ्यांनी पिस्तूल हाताळलेही नव्हते. हे विद्यार्थी असे होते की, दहशतवादी चळवळीचा तर त्यांना अनुभव नव्हताच; पण पैसे व इतर साधनांचे बळही त्यांच्या पाठीशी नव्हते. थोड्याशा मित्रमंडळींचा जो घोळका आजूबाजूला होता, तोही काकोरी कटाच्या निमित्ताने झालेल्या धरपकडीमुळे आमच्यापासून दूर जायला लागला होता. अशा कठीण परिस्थितीतही त्यांनी पार्टीच्या बांधणीचे काम चालू ठेवले होते.

या सर्व कामात शिव वर्मा आघाडीवर होता. शिव वर्मा कधीही निराश न होणारा व संघटना बांधण्यात अगदी वाकबगार होता. १९२५ साली पक्षाची झालेली पीछेहाट, झालेली मोडतोड भरून काढून थोड्याच काळात उत्तर हिंदुस्थानात पक्षाला परत बलवान करण्याचे काम त्याच्यामुळेच झाले यात काहीही शंका नाही.

काकोरी कटाच्या निमित्ताने झालेल्या धरपकडीमुळे आमचा दहशतवादावरचा विश्वास तिळमात्रही कमी झाला नाही. उलट नालायक सरकारी अधिकाऱ्यांविरुद्ध सशस्त्र हल्ले करून साऱ्या देशातील वातावरण तापवण्याची जरुरी आम्हाला जास्तच वाटू लागली. याच काळात जगात घडलेल्या एका महान घटनेचाही आमच्यावर परिणाम होऊ लागला. रशियात क्रांती यशस्वी झाली होती. आपल्या देशातील कामगार चळवळही जोरदारपणे उदयाला येऊ लागली होती. त्यामुळे आम्ही समाजवादी तत्त्वज्ञानाकडे आकर्षिले जात होतो. मिळतील ती समाजवादावरची पुस्तके वाचून त्यावर चर्चा करण्याचा अगदी सपाटा आम्ही लावला होता. ब्रिटिश सत्तेचा या देशातून नायनाट केल्यानंतर कोणत्या तऱ्हेचे सरकार आणावे याबद्दल आमच्यात चर्चा होत असत. शिस्तबद्ध आणि सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या तरुणांच्या तुकडीने केलेला सशस्त्र उठाव हे क्रांतिकारक कामाचे एक अतिशय परिणामकारक स्वरूप आहे हे समाजवादाकडे वळलेल्या या गटाला वाटत होते. हा विश्वास कायम ठेवून त्या गटाने पार्टीची पुनर्रचना केली व 'हिंदुस्थानी समाजवादी प्रजासत्ताक संघटने'चा उदय झाला. या नव्या विचारसरणीचा शिव वर्मावर इतका प्रभाव पडला होता की, पक्षाला हे नवे नाव देण्यात त्याचाच पुढाकार होता.

यानंतर त्याने आपल्या शिक्षणाला रामराम ठोकून आपला सारा वेळ क्रांतिकार्यात घालवण्यास सुरुवात केली. 'हिंदुस्थान समाजवादी प्रजासत्ताक

संघटने'चा उत्तर प्रदेशातील प्रमुख संघटक म्हणून उत्तर प्रदेशातल्या सर्व जिल्ह्यांतून त्याचे भ्रमण सुरू झाले. १९२९ साली सहारनपूरमध्ये त्याला अटक झाली. तेव्हापासून तो तुरुंगातच आहे.

तुरुंगातल्या कैद्यांना माणुसकीची वागणूक मिळावी म्हणून ६३ दिवसांचा जो प्रसिद्ध अन्नसत्याग्रह झाला, त्यात शिव वर्मा सर्वांच्या आघाडीवर होता. अन्नसत्याग्रह चालू असताना एक अशी नाजूक वेळ आली होती की, शिव वर्मा या सत्याग्रहाच्या दिव्यातून वाचेल असे कुणालाच वाटत नव्हते. त्याची प्रकृती इतकी खालावली की, अन्नसत्याग्रहाच्या पंधराव्या दिवसानंतर त्याला बेशुद्धावस्थेतच जेल हॉस्पिटलमध्ये न्यावे लागले. तो तापाने नुसता फणफणला होता आणि त्याला न्युमोनिया झाल्याचे जेल डॉक्टरने आम्हाला सांगितले. छातीत येत असलेल्या जबरदस्त कळांमुळे कित्येक रात्री त्याला झोपेशिवायच काढाव्या लागल्या. दुसरे कसले नाही तर निदान झोपेचे औषध त्याने घ्यावे, अशा आम्ही त्याला विनवण्या केल्या; पण तो त्या गंभीर अवस्थेतही अगदी हलक्या आवाजात एकच वाक्य बोलायचा, "आपण ठरवले आहे की, अन्नसत्याग्रह चालू असेपर्यंत कसलेही औषध घ्यायचे नाही. मी शेवटपर्यंत नियमाचे पालन करणार आहे."

यानंतर तुरुंगात अनेक लढे झाले. तेव्हा प्रत्येक वेळी त्याने हीच करारी वृत्ती दाखवली. एकदा कोर्टामध्येच पोलिसांनी आम्हाला इतके झोडपून काढले की काही विचारू नका. शिव वर्मा या मारामुळे जागच्याजागी बेशुद्ध पडला; परंतु आपल्या ध्येयवादापासून तो थोडाही ढळला नाही.

त्याचा आणखी एक वाखाणण्यासारखा गुण आमच्या नजरेस आला. आमच्या खटल्याचे कामकाज सुरू असायचे तेव्हा त्यात आमच्यापैकी बहुतेक मंडळी फारसे लक्ष देत नसत; पण शिव वर्मा कोर्टात काय चालले आहे त्याकडे फारच बारकाईने लक्ष देत असे. सरकारच्या बाजूने साक्षी दिलेल्या लोकांना उलटसुलट प्रश्न विचारून त्यांचा खोटेपणा तो सिद्ध करत असे. आमच्यापैकी माफीचे साक्षीदार झालेल्यांच्या उलट तपासणीच्या वेळी फारच आक्रमक पवित्रा घेऊन त्याने त्यांचे अगदी भंबेरी उडवून दिली. त्यांच्याच तोंडून उलटसुलट उत्तरे काढून तो त्यांची अगदी दयनीय स्थिती करीत असे. शिव वर्माच्या या वकिली चातुर्यामुळे प्रेक्षकांच्या सज्जात बसलेल्या मंडळींत वारंवार हशा पिकत असे.

सनदशीर पद्धतीने खटल्याचे काम चालवत असलेले कोर्ट बरखास्त करून १९३०च्या ऑक्टोबरमध्ये आमचा खटला चालवण्यासाठी एका खास कोर्टाची

नियुक्ती करण्यात आलेली होती. याच अजब कोर्टाने शिव वर्माला जन्मठेपेची शिक्षा दिली.

सरकारच्या निर्लज्जपणाची कमाल म्हणजे त्यांच्या प्रवक्त्यांनी आम्हाला चांगली वागणूक देऊ अशा दिलेल्या आश्वासनांची पायमल्ली करून 'लाहोर कटा'तील सर्व आरोपींना 'सी' क्लास देऊन त्यांना सूड भावनेने अतिशय क्रूर पद्धतीने वागवण्यात आले. मद्रासमधल्या तुरुंगामध्ये शिव आणि जयदेवना हलवण्यात आले. राजमुंद्री मध्यवर्ती जेलमध्ये साडेपाच महिने अन्नसत्याग्रह तर त्यांना करावाच लागला; पण आणखी कित्येक लढे त्यांना अंदमानला जाण्यापूर्वी द्यावे लागले. तिथेही त्यांचे झगडे नव्याने सुरू झाले व शेवटी १९३७च्या अन्नसत्याग्रहामुळे जेव्हा जनतेतही जोरदार पडसाद उमटू लागले, तेव्हा अंदमानमध्ये खितपत पडलेल्या सर्व राजबंद्यांना हिंदुस्थानात परत आणले गेले.

अंदमानमध्ये शिव वर्माने कम्युनिस्ट तत्त्वप्रणालीचा अवलंब केला व त्यानंतर तो त्या तत्त्वप्रणालीपासून जराही ढळला नाही. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी जपानी फॅसिस्टांनी आपल्या देशाच्या सीमेवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला त्या वेळी शिव वर्मा, जयदेव व गया प्रसाद यांनी तुरुंगातून आपल्या देशबांधवांना एक खळबळजनक आवाहन पाठवले. जनतेची एकजूट भक्कम करा, राष्ट्रीय सरकारवर ताबा मिळवा आणि आक्रमकांना उधळून लावा असे ते आवाहन होते.

ज्या शांत व धीरगंभीर वृत्तीने शिव वर्माने चळवळीत पदार्पण केले, त्याच वृत्तीने आजही तो आपले दिवस तुरुंगात घालवीत आहे. त्याला पूर्ण विश्वास आहे की, त्याचे देशबांधव त्याची तुरुंगातून मुक्तता करतील आणि आपल्या मातृभूमीच्या मुक्ततेच्या लढ्यात त्याला आणखी भर टाकता येईल.

## जयदेव

जयदेव व शिव वर्मा हे एकाच जिल्ह्यातले. शिवपेक्षा जयदेव तीन वर्षांनी लहान असला तरी ते बालमित्र होते. वयाबरोबर त्यांची मैत्री वाढतच गेली. एकाचा विचार करताना दुसऱ्याचा विचार न करणे हे शक्य नाही, इतके ते अविभक्त होते.

अनेक दृष्ट्या त्यांच्यामध्ये दोन ध्रुवांइतके अंतर होते. जयदेव अंगाने मजबूत, कसरतीत निपुण, खेळाबद्दल अतिशय वेड असलेला, उतावळा आणि तापट; तर शिव वर्मा प्रकृतीने किरकोळ, शांत, अभ्यासू आणि थंड डोक्याचा. त्यांच्यात मात्र एक दुवा होता तो म्हणजे, आपल्या देशावरचे व देशातल्या सर्वसामान्य

जनतेवरचे त्यांचे ज्वलंत प्रेम. या प्रेमामुळेच त्यांनी १९२१च्या असहकारितेच्या लढ्यात स्वत:ला झोकून दिले व त्यानंतर आपल्या जिल्ह्यात समाजसेवेचे काम पत्करले.

१९२५ साली जयदेवने कानपूरच्या डी. ए. व्ही. कॉलेजमध्ये प्रवेश घेतला व तिथूनच पुढे दहशतवादी चळवळीत तो एक क्रियाशील कार्यकर्ता बनला. भारतातल्या व परदेशातल्या घटनांचा परिणाम होऊन इतरांप्रमाणे जयदेवही समाजवादी विचारांकडे वळू लागला; पण तो तेवढ्यावरच थांबला नाही. आपल्या देशात शेतकरीवर्गाची खरोखरच काय परिस्थिती आहे, याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी तो लखनौ व हरदोईमधील बऱ्याच खेड्यापाड्यांतून हिंडला. विशेषत: पासी नावाची सरकारने 'गुन्हेगारी जमात' असे वर्गीकरण केलेली एक अस्पृश्य जमात त्याने खूप जवळून पाहिली. त्याने जेव्हा खेडी पाहिली, तिथल्या गरीब शेतकऱ्यांचे दारिद्र्य पाहिले, सर्वांत खालच्या थरांतल्या लोकांची तीव्र सामाजिक अवहेलना व कायद्याने होत असलेली पिळवणूक पाहिली, तेव्हा त्याचे रक्त पेटून उठले. त्याला समजून चुकले—जोपर्यंत सर्व प्रकारची पिळवणूक पूर्णपणे नष्ट होत नाही; जोपर्यंत लोकांचे खरे राज्य प्रस्थापित होत नाही, तोपर्यंत खरा 'बदल' होत नाही.

काही काळ तो बनारस हिंदू विद्यापीठात होता. तिथेही त्याचे क्रांतिकारक काम चालूच होते. नंतर त्याने विद्यापीठाला रामराम ठोकून क्रांतिकार्याला पूर्णपणे वाहून घेतले. १९२९ साली शिव वर्मा व गया प्रसादबरोबर त्यालाही सहारनपूरमध्ये बॉम्ब तयार करण्याच्या कारखान्यात पकडले.

'लाहोर कटा'च्या खटल्यात आम्ही जे जे लढे दिले, त्यात जयदेव अगदी हिरिरीने भाग घ्यायचा. लढा करण्यासाठी त्याचा हात नेहमी प्रथम वर व्हायचा. अन्नसत्याग्रह असो, पोलिसांशी लढत असो किंवा दुसऱ्या राजबंद्यांना सहानुभूती दाखविण्याचा लढा असो, त्याला जयदेवचा पाठिंबा हा ठरलेलाच असे. एकदा निर्णय घेतला आणि नंतर जर कोणतीही तडजोडीची लक्षणे दिसू लागली तर तो त्यांना तीव्रपणे विरोध करायचा.

एकदा मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात कामकाज चालू असताना आमच्यापैकी वयाने सर्वांत लहान असलेल्या प्रेम दत्तने जय गोपाळ नावाच्या उर्मट माफीच्या साक्षीदारावर जोडा भिरकावून दिला. कारण जय गोपाळ आमच्या पक्षाची व आमच्या कार्याची अगदी चीड येईल अशी निर्भत्सना, चेष्टा करत होता. या अकस्मात घडलेल्या घटनेने जय गोपाळला काहीही इजा झालेली नव्हती; पण

पोलिसांच्या सांगण्यावरून मॅजिस्ट्रेटने उरलेले कामकाज होईपर्यंत आम्हाला हातबेड्या घालाव्यात असे फर्मान काढले.

त्या दिवशी कोर्टाचे काम तिथेच थांबले. दुसऱ्या दिवशी आम्ही जेलच्या दरवाजाशी आलो, तेव्हा आदल्या दिवशीचा हुकूम अमलात आणण्यात येणार आहे, असे आम्हाला बजावले.

आम्ही अर्थातच या गोष्टीला विरोध केला. कित्येक पोलिसांनी आमच्यावर हल्ला केला. आम्ही त्याला जमेल तसे उत्तर देण्याचा प्रयत्न केला. जेलच्या आवारात जंगी मारामारी सुरू झाली. या हल्ल्यात कंवल नाथ, विजय सिन्हा व राजगुरू यांना गंभीर स्वरूपाच्या जखमा झाल्या. एक तासभर चाललेल्या या धुमश्चक्रीनंतर आमच्यापैकी फक्त पाच जणांना पोलीस सक्तीने नेऊ शकले.

दुसऱ्या दिवशी आम्हाला असा निरोप पाठवला की, जर आम्ही कोर्टात येताना हातकड्या घालून आलो, तर हातकड्या घालूनच कोर्टात हजर झाले पाहिजे या हुकुमाचा फेरविचार होण्याचा संभव आहे. यावर कोणता पवित्रा घ्यावा याबद्दल आमच्यामध्ये खूपच गरमागरम चर्चा झाली. जयदेवने या गोष्टीला आपला संपूर्ण विरोध असल्याचे सांगितले. माझे व किशोरी लालचेही तेच मत होते. पण ते बहुमत नव्हते. शिव वर्मा व विजय सिन्हाने असा मुद्दा मांडला की, 'काल जे जेलच्या आवारात घडले त्याचा बाहेरच्या लोकांना पत्ता नाही. नि:शस्त्र कैद्यांवर केलेला अमानुष लाठीहल्लाही प्रसिद्धीस येणार नाही; कारण तो तिथेच घडला. उद्या मॅजिस्ट्रेटने हातबेड्या काढण्याला नकार दिला तर आपण परत लढू शकतो. पण यावेळी आपण कोर्टातच लढू. इथे कायद्याच्या नावाखाली काय अमानुष व क्रूर कृत्ये केली जातात हे लोकांना दिसू दे आणि आपणही कसे वाघाचे बच्चे आहोत ते लोकांना कळू दे.' या तर्कशुद्ध विचाराची अखेर सरशी झाली. सतत हसतमुख असणाऱ्या किशोरी लालच्या डोळ्यांना हातबेड्या घालून घेताना पाणी आल्याशिवाय राहिले नाही.

मॅजिस्ट्रेट आपल्या दिलेल्या शब्दाला काही जागला नाही. आमच्या हातातल्या बेड्या काही काढल्या गेल्या नाहीत. आपण यांना कसे नरम केले आहे या भावनेने पोलिसांच्या डोळ्यांत एक खुनशी विजयाची चमक दिसत होती. या अपमानास्पद घटनेने जयदेव अगदी बेचैन झाला होता. भयानक अवहेलनेने आणि शरमेने डोके खाली घालून तो बसला होता.

दुपारच्या जेवणाची व्यवस्था कोर्टाबाहेरच एक तंबू बांधून करण्यात आली

होती. जेवणासाठी आमच्या एका हातातला बेडी मोकळी करण्यात आली होती. आम्ही परत दुसऱ्या हातात पोलिसांना बेडी घालू द्यायची नाही असा निर्णय घेतला.

यानंतर जो प्रकार घडला तसा क्वचितच कोणत्याही कोर्टात घडला असेल. हातातल्या बेडीमुळे एक हात निकामी असताना आमच्यावर पन्नासपेक्षा जास्त पोलीस व पोलीस इन्स्पेक्टर्सनी हल्ला केला, आम्हाला लाठ्यांनी बडवून काढले आणि खाली पडताच आमच्यावर लाथाबुक्क्यांची झोड उठवली. अशाच अवस्थेत फरफटत नेऊन कोठीच्या खोलीत पोती फेकून द्यावी तसे आम्हाला फेकून दिले. शिव वर्माचे डोके जमिनीवर आपटल्यामुळे तो जागच्या जागी बेशुद्ध झाला. काहीजणांची शरीरे रक्तबंबाळ झालेली होती तर काहींची काळी-निळी पडली होती.

जयदेव हा आम्हा सर्वांमध्ये तगडा. त्यामुळे त्याच्यावर पोलिसांचा खास डोळा होता. त्याला चक्क चारचौघांनी पकडून बेदम मारले होते. त्याचे सर्व कपडे रक्ताने माखून गेले होते. त्यांच्या फाटून चिंध्या झालेल्या होत्या. त्या अवस्थेतही तो कसाबसा उभा राहिला व त्याने हृदयाचा ठाव घेणारे भाषण केले. अशी पाशवी कृत्ये प्रत्यक्ष डोळ्यांसमोर होऊ देणाऱ्या मॅजिस्ट्रेटला 'राजीनामा द्या' असे खडखडीत शब्दांत सांगितले, तर तिथल्या प्रेक्षकांना त्यांनी पाहिलेला हा हृदयद्रावक प्रसंग कधीही विसरू नका असे आवाहन केले. दुसऱ्याच दिवशी हातबेड्या घालण्याचा हुकूम रद्द करण्यात आला.

आमच्या गैरहजेरीत चाललेल्या कोर्टाने सहारनपूरच्या बॉम्बच्या कारखान्यात सापडला एवढ्याच पुराव्यावरून जयदेवला जन्मठेपेची शिक्षा फर्मावली.

त्यानंतरचे त्याचे तुरुंगातले आयुष्य लढ्यांनी भरलेले आहे. राजमुंद्री तुरुंगात त्याला साडेपाच महिने अन्नसत्याग्रह करावा लागला. पंडित मदन मोहन मालवीय व इतर पुढाऱ्यांच्या मध्यस्थीमुळे तो थांबवण्यात आला. एकदा तर जेलरसमोर नमते न घेतल्याबद्दल त्याला फटक्यांची शिक्षा भोगावी लागली.

अंदमानच्या तुरुंगातही सर्व लढ्यांत जयदेव आघाडीवर असायचा. तसेच जयदेव 'कम्युनिस्ट कन्सॉलिडेशन'च्या प्रमुख संघटकांपैकी एक होता. ('कम्युनिस्ट कॅन्सॉलिडेशन' ही कम्युनिझमकडे वळलेल्या व भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या मार्गदर्शनाखाली काम करायचे ठरविलेल्या राजबंद्यांची संघटना होती.) काही काळ जयदेव या संघटनेचा सेक्रेटरी व संघटनेच्या 'कॉल' नावाच्या

हस्तलिखिताचा संपादकही होता. हिंदीमधला एक जबरदस्त लेखक, अतिशय परिणामकारक वक्ता आणि त्यात मार्क्सवादाचा खोलवर अभ्यास केलेला हा माणूस म्हणजे आमच्या स्वातंत्र्य चळवळीचा एक अमूल्य ठेवा होता.

आता तो सोळा वर्षांहून अधिक काळ तुरुंगात राहिलेला आहे. वारंवार त्याच्यावर झालेले हल्ले, इतके अन्नसत्याग्रह या कठीण सत्त्वपरीक्षांनी त्याचे मनोधैर्य तर खचले नाहीच पण तो शरीरानेही दुबळा झाला नाही. या संघर्षमय जीवनाने त्याचे विचार प्रगल्भ झालेले आहेत. मनात येईल ते धाडदिशी करणारा सोळा वर्षांपूर्वीचा तरुण तो आज राहिलेला नाही; पण ज्या जिद्दीने या तेरा वर्षांच्या मुलाने असहकारितेच्या चळवळीत स्वत:ला झोकून दिले, ती जिद्द मात्र अजून तशीच कायम आहे.

## डॉ. गया प्रसाद

'हिंदुस्थान समाजवादी प्रजासत्ताक संघटने'चे बहुतेक सर्व सभासद अगदी तरुण वयाचे विद्यार्थी होते. डॉ. गया प्रसाद मात्र तसे नव्हते. त्यांचे लग्न झालेले होते, डॉक्टरी चांगली चालत होती व संसार नीट चाललेला होता. १९२१-२२च्या असहकारितेच्या चळवळीत ते पूर्णपणे सहभागी झाले. या चळवळीतल्या अपयशामुळे व आलेल्या निराशेमुळे त्यांना अधिक खोल विचार करणे भाग पडले. त्यांच्याबरोबरचे कित्येक राजकीय कार्यकर्ते परत आपापल्या पूर्वीच्या उद्योगधंद्यांना लागले. पण गया प्रसादना ते जमले नाही. ते क्रांतिकारक दहशतवादी चळवळीत सामील झाले.

त्या दिवसांत त्यांना जाड व नीट वाढवलेली दाढी होती. त्यामुळे ते त्यांच्या वयाच्या मानाने मोठे व खूपच भारदस्त दिसायचे. हा चष्मा घातलेला, मध्यम वयाचा वाटणारा व अतिशय प्रतिष्ठित दिसणारा माणूस जेव्हा गंभीरपणे आपल्या रोग्यांना तपासायचा त्यावरून कोणाही सर्वसाधारण माणसाला तो बॉम्ब आणि पिस्तुलांच्या साहाय्याने ब्रिटिश सत्तेला उलथवून टाकू पाहणाऱ्या पक्षाचा सक्रिय कार्यकर्ता असेल अशी कल्पनाही येऊ शकली नसती. डॉ. गया प्रसादांची दाढी व त्यांचे वैद्यकीय कौशल्य याचा आम्हाला अतिशय उपयोग झाला. त्यामुळे पोलिसांकडून त्यांना स्वत:लाच लपता येत होते असे नव्हे, तर पार्टीलाही त्यामुळे सुरक्षितता मिळायची. जेव्हा जेव्हा गरज वाटायची तेव्हा तेव्हा गया प्रसाद एक छोटासा दवाखाना उघडायचे; आणि अर्थातच त्यांचा दवाखाना हे पक्षाचे गुप्त केंद्र बनायचे.

नंतरच्या काळात उत्तर प्रदेश व पंजाबमध्ये काम करत असताना शेवटी शिव वर्मा व जयदेव यांच्याबरोबर सहारनपूरमध्ये त्यांना पकडण्यात आले. माझी व त्यांची जेलमध्ये आल्यानंतर जी भेट झाली तेव्हा त्यांची प्रसिद्ध दाढी चेहऱ्यावर नसल्याचे पाहून मला तसा धक्काच बसला.

गया प्रसाद तसे जरा जाडजूड होते पण ते मजबूत कधीच नव्हते. त्यामुळे जेलमध्ये होणाऱ्या असंख्य लढ्यांत व चकमकीत त्यांचे खूपच हाल झाले. पण एकदाही त्यांनी माघार घेतली नाही.

ते आमच्याशी जवळ जवळ आईसारखे वागायचे. नेहमी स्वच्छ आणि नीटनीटके राहणाऱ्या या माणसाला आमची अस्ताव्यस्त आणि अव्यवस्थित राहणी मुळीच आवडायची नाही. ते स्वत:ची चादर दर तीन दिवसांनी बदलायचे, कपडे धुवायचे, कपाट साफ ठेवायचे आणि पुस्तके व इतर वस्तू नीट लावून ठेवायचे. एवढ्यावर स्वस्थ न बसता आम्हीही तसेच राहिले पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. कित्येकदा आमची कामे स्वत: करून ते आम्हाला शरमिंदे करायचो. मी सर्वांत अव्यवस्थित असणाऱ्यांपैकी एक असल्यामुळे माझ्यावर तर त्यांचा फारच डोळा असे. त्यांना माझ्या खोलीकडे येताना पाहिले की मी पळच काढायचो. मात्र नंतर खोलीत आल्यावर पाहावे तर गादीवरची चादर बदललेली असायची, सगळ्या वस्तू नीट जागेवर ठेवलेल्या असायच्या.

त्यांच्या व्यवस्थितपणामुळे व पद्धतशीरपणामुळे गया प्रसाद म्हणजे आम्हाला एक चांगले व्यवस्थापक लाभले होते. जेलमधले आमचे रसोईघर, त्यातले कैदी-आचारी यांच्याकडे लक्ष देणे, त्यांच्याकडून वेगवेगळे पदार्थ करून घेणे असली कटकटीची कामे ते निष्ठेनेच नाही तर खऱ्याखुऱ्या आनंदाने करत. मला तर अशा कामांची अगदी भीतीच वाटायची. आपल्या स्वत:च्या पाककौशल्याचा त्यांना अभिमान होता आणि ती गोष्ट काही खोटी नव्हती. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी आम्हाला एकाहून एक सरस पाककृती—विशेषत: मांसाहारी—करून दिलेल्या आहेत. या मॅनेजरच्या कारकिर्दीचा आम्ही पुरेपूर फायदा घेतला आणि आम्ही खुषीत येऊन जेव्हा म्हणायचो, 'डॉक्टरसाहब, आज तो आपने कमाल कर दिया' तेव्हा तर त्यांचा चेहरा अभिमानाने आणि आनंदाने उजळून जायचा.

जेलचे डॉक्टर लोक तसे काही वाईट नव्हते. त्यांनाही डॉ. गया प्रसाद आवडायचे. आमच्यापैकी कुणी आजारी पडला की त्याची गया प्रसाद अगदी प्रेमाने, एखाद्या आईसारखी काळजी घेत; कितीही क्षुल्लक आजार असो, जेल-

डॉक्टरांशी चर्चा करून योग्य ते औषध मिळेपर्यंत गप्प बसत नसत. सर्वांत अवघड गोष्ट म्हणजे आम्ही सांगितलेल्या वेळी औषध घेतो की नाही यावरही लक्ष ठेवीत. आजारी माणूस आपल्या औषधाबद्दल नेहमीच विसरत असे पण गया प्रसाद मात्र विसरत नसत. गया प्रसाद म्हणजे आमचे व्यवस्थापक, आमचे मुख्य आचारी, आमचे दक्ष डॉक्टर, ममतेने सेवा करणारे या सगळ्यांचा एक मिलाफ होते.

गया प्रसाद तर कोणतेही दहशतवादी कृत्य होत असताना प्रत्यक्ष हजर असल्याचा पुरावा सरकारच्या बाजूने सादर झालेला नव्हता. ब्रिटिश सत्तेला त्याची पर्वा नव्हती. राजाविरुद्ध लढा द्यायला उभ्या ठाकलेल्या एका पक्षाचे ते कार्यशील सभासद होते आणि शिवाय त्यांना बॉम्बच्या कारखान्यातच अटक करण्यात आलेली होती. एवढी गोष्ट त्यांना त्यांच्या गैरहजेरीत जन्मठेपेची शिक्षा देण्यास सरकारला पुरेशी वाटली. इतरांप्रमाणे त्यांनाही 'सी' वर्गाचे कैदी म्हणून राहावे लागले. तेव्हापासून जेलमधल्या असंख्य लढ्यांत त्यांनी भाग घेतला. अंदमानमधल्या १९३७च्या अन्नसत्याग्रहातही ते होते. आणि आता ते सुलतानपूरच्या जेलमध्ये होते. अंदमानमध्ये कम्युनिझमचा त्यांनी स्वीकार केला आणि जसजशी वर्षे जाताहेत तसे ते अधिकच या तत्त्वप्रणालीशी दृढ होत जात आहेत.

कारावासात सोळा वर्षे जिवंतपणे मरण भोगून त्यांचे शरीर अगदी जर्जर झालेले आहे. गेल्या वर्षीपासून त्यांना क्षयाचा आजार जडला आहे आणि त्यात त्यांची प्रकृती फारच चिंताजनक आहे. पंजाब सरकारला साध्या मानवतेचा थोडा जरी अंश असता तरी त्या सरकारने त्यांच्या या कैद्याला मुक्त केले असते. ज्याने आपले सारे आयुष्य देशासाठी वेचलेले आहे, ज्याने जन्मठेपेची १४ वर्षांची शिक्षा दोन वर्षांपूर्वीच संपवलेली आहे अशा या थोर व्यक्तिमत्त्वाच्या माणसाला सरकारने जगू तर नाहीच पण आपल्या सोबत्यांमध्ये शांतपणे मरूही द्यायचे नाही असे ठरवलेले आहे.

याचा अखेरचा निकाल कोण लावणार? या प्रश्नाचे उत्तर गया प्रसाद ज्या बांधवांसाठी जगले आणि ज्यांच्यासाठी मरतही आहेत त्यांनीच द्यायचे आहे.

## आमच्या संघटनेची वाताहत

१९३०च्या फेब्रुवारीत चंद्रशेखर आझाद मारला गेला. हिंदुस्थानी समाजवादी प्रजासत्ताक संघटनेला या घटनेने इतका जबरदस्त धक्का बसला की संघटनेला

त्यातून परत डोके वर काढताच आले नाही. केवळ सरकारच्या अमानुष दडपशाहीमुळेच आमच्या पक्षाचा अंत झाला असे म्हणता येणार नाही. त्यापेक्षाही महत्त्वाची व मूलभूत कारणे त्यामागे होती. वारंवार येणाऱ्या अपयशातून व वाढणाऱ्या अंतर्गत मतभेदांतून पक्षाला संघटित ठेवणारी व्यक्ती म्हणजे आझाद. त्याचे व्यक्तिमत्त्व लोकांमध्ये आत्मविश्वास व प्रचंड आदर निर्माण करीत असे. आझादच्या मृत्यूने सर्वत्र निराशेची पोकळी झपाट्याने वाढली. कैलेशपतीसारख्या पुढारलेल्या दहशतवाद्यांनी दगा देऊन आधीच आम्हा सहकाऱ्यांना धक्का पोचवला होता. चंद्रशेखर आझादच्या मृत्यूला आमच्यापैकीच एकाची फितुरी कारणीभूत झाली होती हेही नंतर आम्हाला समजले.

एकमेकांबद्दल एक प्रकारचे संशयाचे गढूळ वातावरण पक्षात इतक्या तीव्रतेने पसरू लागले की आपल्यापैकी कुणीही दगाबाज असू शकेल, कुणीही पोलिसांचा हेर असेल असेही वाटायला लागले. एकमेकांबद्दलचा विश्वास साफ लयाला गेला. व्यक्तिगत भांडाभांडी, आरोप-प्रत्यारोप यांनी वातावरण अगदी दूषित होऊन गेले. पोलिसांच्या हेरांनी आणि काही भ्रष्टाचारी लोकांनी पक्षात वाव मिळवून घेतला आणि असलेल्या परिस्थितीचा पुरेपूर फायदा करून घेतला. पैशांची अफरातफर, स्वत:च्या फायद्यासाठी घातलेले दरोडे, नैतिक बेजबाबदारपणाची वागणूक यांना अगदी ऊत आला.

या घटनांमुळे वैतागून बहुसंख्य सभासदांनी राजकारणाचा पूर्णपणे त्याग केला. त्यांचा दहशतवादावरचा, त्यांच्या साथीदारांवरचा, स्वत:वरचा विश्वास तर उडालाच पण खुद्द स्वातंत्र्यलढ्यावरचाही विश्वास उडाला. आपल्या देशात काहीही घडू शकणार नाही, हा सारा देश नामर्दांचा बनला आहे हे त्यांचे रडगाणे बनले. जे थोडे चांगले साथीदार गुप्तपणे काम करून अटक होण्यापासून बचावले होते त्यांनाही पकडण्यात आले, त्यांना लांब पल्ल्याच्या सजा ठोठावण्यात आल्या, तर उरलेले उदासीन व दु:खी होऊन निष्क्रियतेच्या गर्तेत अडकून पडले.

आझाद आणि भगतसिंगांनी जिवाचे रान करून, प्रसंगी आपले रक्त सांडून जो पक्ष बांधला होता तो आतून इतका पोखरून गेला होता की, सरकारी दडपशाहीपुढे त्याचा मुळीच टिकाव लागू शकला नाही आणि तो अक्षरश: रसातळाला पोचला. आतापर्यंत कधीही नव्हते इतके स्वच्छ ढळढळीत सत्य नजरेसमोर आले. वैयक्तिक सशस्त्र हल्ल्यांना सर्वोच्च प्रकारचा लढा समजणाऱ्या आणि सर्वसाधारण लोकांपासून दूर राहून कार्य करणाऱ्या मध्यमवर्गीय क्रांतिकारकांच्या पक्षाला देशामध्ये जागृती तर आणता आली नाहीच पण त्यांच्या

स्वत:च्या अंतर्गत एकोप्यासाठी व धैर्यासाठीसुद्धा त्यांना काही नेत्यांच्या असामान्य व्यक्तिमत्त्वावर व त्यांच्या अस्तित्वावर अवलंबून राहावे लागले. आम्ही उराशी बाळगलेल्या क्रांतिकारक स्वप्नांचा या अनुभवांनी पार चक्काचूर झाला.

दहशतवादावरचा जो उरलासुरला विश्वास माझ्यात राहिला होता तोही आता झपाट्याने खलास होऊ लागला. पण प्रश्न हा होता, याला पर्याय काय?

## गांधी-आयर्विन समझोत्याचे परिणाम

पटकन उत्तर सापडावे असा हा प्रश्न नव्हता. १९३० साली एक वेळ असेही वाटले की काँग्रेसने सनदशीर मार्गाचा बीमोड केलेला आहे व काँग्रेसचे नेतृत्व देशाला क्रांतीच्या दिशेने नेत आहे. गांधी-आयर्विन समझोत्याने या आशेवर पाणी फिरवले. अगदी आशावादी होते त्यांनाही हा समझोता आपल्या देशाचा विजय आहे असे वाटले नाही. भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांच्या फाशीच्या शिक्षा रद्द करा अशा मागणीचा जो सर्वत्र जनतेत उठाव झाला त्यालाही न जुमानता गांधी-आयर्विन समझोत्यानंतर लागलीच त्या तिघांना फासावर चढविण्यात आले. या प्रकारानंतर सर्वांमध्ये त्या समझोत्याबद्दल साशंक भीती निर्माण झाली. त्यामुळे जिकडे तिकडे निराशेचे, थंड, एका साचलेल्या डबक्यासारखे वातावरण झाले. काही महिन्यांपूर्वीच सोलापूर, पेशावर, चित्तगाव येथे घडलेल्या हलवून टाकणाऱ्या क्रांतिकारक घटना फार पूर्वीच विस्मृतीत दडलेल्या घटना वाटू लागल्या.

प्रत्येक काँग्रेस कार्यकर्ता या समझोत्याबद्दल कडवटपणे बोलत असे व त्यामुळे अखिल भारतीय काँग्रेसच्या खुल्या अधिवेशनात तरी त्याला मंजुरी मिळेल असे वाटले नव्हते. आता या समझोत्याचा पराभव होणार किंवा निदान मोठ्या संख्येने त्याचा धिक्कार तरी केला जाणार या अपेक्षेने मी कराचीला काँग्रेसच्या अधिवेशनासाठी निघालो. तिथे माझी व सुभाषचंद्र बोस यांची जेव्हा भेट झाली तेव्हा त्यांनी उघडपणे सांगून टाकले की, ते या समझोत्याला अगदी कडाडून विरोध करतील. डाव्या विचारसरणीच्या काँग्रेस कार्यकर्त्यांसमोर बोलताना ते म्हणाले, "आपल्या व ब्रिटिश सरकारमध्ये आहुतीत दिलेल्या रक्ताचा समुद्र व शरीरांचा पर्वत आहे. पृथ्वीवरची कोणतीही शक्ती पुढे येवो, आम्ही गांधीजींनी मान्य केलेल्या या समझोत्याचा स्वीकार करणे शक्य नाही."

एवढ्या त्वेषाने व तळमळीने बोलणारे सुभाषचंद्र बोस याच विषयावर विषयनियामक समितीच्या सभेत बोलताना जेव्हा मी ऐकले तेव्हा मला आश्चर्याचा

धक्काच बसला. त्यांनी या समझोत्याबद्दल नाराजी दर्शवली, तरीही हा प्रश्न जेव्हा ठरावाच्या रूपाने पुढे येईल तेव्हा आपण त्याला विरोध करणार नाही असेही सांगून टाकले. ठराव प्रत्यक्ष मतदानासाठी जेव्हा आला त्या वेळी थोड्या जणांनी मतदान केले नाही आणि कॉ. सरदेसाई व त्यांच्याबरोबरच्या मोजक्या कॉम्रेड्सखेरीज कोणीही विरोध केला नाही; आणि गांधीजींनी ब्रिटिश सत्तेबरोबर केलेल्या या समझोत्याला मान्यता मिळाली. या घटनेमुळे एक मात्र झाले. माझ्या डोक्यात असलेला निरनिराळ्या मतांचा, शंकांचा गोंधळ पूर्ण संपुष्टात आला. दहशतवाद जसा स्वातंत्र्याकडे नेणारा खरा मार्ग नव्हता, तसेच डाव्या राष्ट्रीयवादावर पोकळ गप्पा मारणारे काँग्रेस राजकारणही त्याला पर्याय होऊ शकत नाही याची स्पष्ट जाणीव मला झाली.

कॉ. सरदेसाईंची व माझी कराचीमध्येच प्रथम भेट झाली. त्यांच्याशी माझे जे बोलणे व चर्चा झाली त्यानंतर दहशतवादी चळवळीशी जे उरलेसुरले संबंध होते तेही मी साफ तोडून टाकले.

माझी जवळून ओळख झालेला पहिला कम्युनिस्ट म्हणजे कॉ. सरदेसाई. आतापर्यंत मी कित्येक राजकीय कार्यकर्त्यांना भेटलेलो होतो पण दहशतवादी चळवळीमध्ये सर्वस्वाची होळी करायला निघालेल्या कार्यकर्त्यांव्यतिरिक्त कट्टर क्रांतिकारक म्हणता येईल असा कोणीही मला भेटलेला नव्हता. कॉ. सरदेसाईंकडे केवळ त्यांच्या तत्त्वप्रणालीमुळे नव्हे तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे मी खेचला गेलो.

हिंदुस्थान समाजवादी प्रजासत्ताक संघटनेच्या अनेक सभासदांप्रमाणेच मीसुद्धा कित्येक वर्षांपासून समाजवाद हेच आपले अंतिम ध्येय आहे या विचाराला पोचलो होतो व लाहोर कटाच्या अटकेपूर्वी काही काळ कानपूरच्या ट्रेड युनियन चळवळीत मी कामही केलेले होते. संपलढ्यात कामगारांनी दाखवलेली लढवय्यी वृत्ती पाहून मी चकित झालो होतो पण हरीहरनाथ शास्त्री व गोपीनाथ हे त्यांचे पुढारी पाहून तशी कोणतीच छाप माझ्या मनावर पडली नाही. कल्पनाशक्तीला कितीही ताण दिला तरी त्यांना क्रांतिकारक म्हणणे कधीच शक्य नव्हते. मला ती चळवळ मुळीच क्रांतिकारक वाटली नाही; उलट काँग्रेस राजकारणाचा कामगारांमधला तो केवळ एक भाग वाटला.

कॉ. सरदेसाई म्हणजे माझी अगदी आवडती, मनासारखी व्यक्तीच मला भेटली. कराची काँग्रेसच्या गडबडीत आम्हाला जरी तपशीलवार व खोलवर चर्चा करता आल्या नाहीत तरीही त्यांच्याशी जी काही चर्चा मी करू शकलो

तिचा माझ्या मनावर खोल ठसा उमटला. ज्या गोष्टीची मला जाणीव व्हायला सुरुवात झालेली होती ती आता अधिकच दृढ बनत चालली—मूठभर तरुण मुले क्रांती करू शकली नाहीत, इतकेच काय पण लोकजागृतीही त्यांना करता आली नाही. परकीय सत्तेला उलथवून टाकायला लागणाऱ्या क्रांतिकारक उठावासाठी सर्वसाधारण लोकांमध्ये सतत व पद्धतशीर कामाची गरज आहे, त्यांच्या मागण्यांच्या लढ्यातून त्यांना संघटित करायची आवश्यकता आहे आणि यामधून हळूहळू व छोट्या छोट्या लढ्यांतून शेवटच्या राज्ययंत्रणा काबीज करायच्या लढ्यापर्यंत पोचले पाहिजे हे मला पटले.

रेल्वे कामगार, गोदी कामगार आणि इतर अत्यावश्यक उद्योगधंद्यांत काम करीत असलेल्या कामगारांच्या हातात साऱ्या समाजाचा गाडा चालू ठेवण्याचे सामर्थ्य असल्यामुळे हा वर्गच या क्रांतिकारक चळवळीच्या आघाडीवर असणे अगदी अपरिहार्य होते. त्या वेळेपुरते ट्रेड युनियन चळवळीचे पुढारीपण गाजवणाऱ्या व्यक्तींवरून कामगारवर्गाची शक्ती अजमावणे ही एक प्रचंड चूकच झाली असती. कामगार काय करू शकतात हे त्यांनी सायमन कमिशनवर घातलेल्या बंदीवरून आणि असंख्य राजकीय व आर्थिक पातळीवरच्या झगड्यांवरून उघडकीला आलेले होते. अशा वेळी कामगारांवरचा सुधारणावाद्यांचा पगडा नष्ट करून त्यांच्यात क्रांतिकारक जागरूकता निर्माण करून हा देश खऱ्या अर्थाने स्वतंत्र करण्यामध्ये कामगारांची केवढी जबाबदारी आहे याची जाणीव करून देणे ही महत्त्वाची कामगिरी होती.

## मी कम्युनिस्ट पक्षाचा सभासद झालो

कराचीहून परतल्यावर मी ताबडतोब कानपूरच्या मजदूर सभेत काम करायला सुरुवात केली. तसेच मार्क्सवादावरची जी जी मिळतील ती ती पुस्तके वाचण्याचा सपाटा चालवला. काही महिने मानवेंद्रनाथ रॉयशी माझा संबंध आला. रॉयवाद व कम्युनिझम याच्यात काय फरक आहे याची मला काहीच कल्पना नसल्यामुळे मी त्यांना कम्युनिस्टच समजत असे. त्यानंतर मात्र जेव्हा रॉयवादाचे सत्य स्वरूप मला नीट उमजले तेव्हा मी त्यांच्याशी असलेला संबंध तोडून टाकला.

१९३१ साली एका खोट्या आरोपाखाली मला पकडण्यात आले. तुरुंगातल्या त्या दीड वर्षाच्या काळात मी स्वतःच पूर्णपणे अभ्यासाला वाहून घेतले. योगायोगाने त्याच वेळी कॉ. सरदेसाई कानपूरमध्ये आले होते. त्यांनाही कानपूरमध्ये पकडून माझ्या बराकीतच काही आठवडे ठेवले होते. या काळात

त्यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर माझ्या मनातल्या शंका-कुशंका नाहीशा झाल्या आणि १९३३ साली मी जो जेलमधून सुटून बाहेर आलो तो एक पूर्ण कम्युनिस्ट बनूनच.

आज त्या घटनेला १२ वर्षे पूर्ण झालेली आहेत. या काळात आपल्या देशात तसेच सबंध जगात अनेक महत्त्वाच्या घडामोडी झाल्या. १९३३ साली ज्या कम्युनिस्ट पक्षात मी सामील झालो तो एक अगदी लहानसा गट होता, आज त्याचे रूपांतर एका संघटित मोठ्या पक्षात झालेले आहे. त्याच्या शाखा व उपशाखा देशाच्या कानाकोपऱ्यांत पसरलेल्या आहेत. पक्षाची पाळेमुळे कामगारवर्ग व शेतकऱ्यांमध्ये इतकी दृढ रुजलेली आहेत की कसल्याही तऱ्हेच्या दडपशाही किंवा निंदानालस्तीमुळे पक्षाची होणारी वाढ खुंटणे शक्य नाही. साध्यासुध्या कामगार व शेतकरीवर्गातून आलेले स्त्री-पुरुष मला कम्युनिस्ट पक्षात आढळलेले आहेत. भगतसिंग व दहशतवादी चळवळीतल्या माझ्या कॉम्रेड्समध्ये असलेला साम्राज्यशाहीबद्दलचा जळजळीत राग, आपल्या देशावर असलेले नितांत प्रेम व निष्ठेने कशाचीही अपेक्षा न करता सतत काम करत राहण्याची वृत्ती या साऱ्या गोष्टी मला कम्युनिस्ट पक्षातील सभासदांत दिसून आलेल्या आहेत. कोणालाही अभिमान वाटावा अशीच ही गोष्ट आहे. अशा कॉम्रेड्सबरोबर काम करण्यात एक प्रकारचा आनंद व माझा सन्मानही मला वाटत आलेला आहे.

## माझ्या जुन्या दहशतवादी साथीदारांची झालेली पुनर्भेट

कित्येकदा माझ्या मनात विचार येत असत की माझे 'लाहोर कटा'तले जुने सहकारी अंदमानच्या तुरुंगात काय करत असतील, कोणत्या हालअपेष्टांतून आयुष्य कंठत असतील, त्यांची मन:स्थिती कशी असेल, त्यांचे विचार कसे चालत असतील? अधूनमधून येणाऱ्या तुरळक बातम्यांवरून एवढेच समजायचे की, राजकीय कैद्यांना योग्य ती वागणूक मिळण्यासाठी ते अजूनही आझाद व भगतसिंगच्या लढाऊ मार्गाचा अवलंब करत आहेत. फटक्यांची शिक्षा असो की पोलिसांचे दंडुके असोत, कशाहीपुढे आपली मान त्यांनी तुकवली नाही. महावीर सिंग या लाहोर कटातल्या एका आरोपीने अंदमानमध्ये राजकीय कैद्यांना मानवी हक्कांसाठी लढताना प्राणार्पण केले. त्यांच्याशी संबंध साधण्याची मला सारखी ओढ लागलेली होती पण काहीच उपाय नव्हता. मी पाठवलेली पत्रेसुद्धा त्यांना कधीच पोचत नसत.

१९३८ मध्ये बातमी आली की, अंदमानमधले आमचे जवळ जवळ सर्व

सहकारी कम्युनिस्ट बनले आहेत. माझ्या आनंदाला व अभिमानाला सीमा नव्हती. कित्येक वर्षांपूर्वी आमच्यामध्ये शिरलेल्या अगदी सुरुवातीच्या समाजवादी कल्पना आज फलद्रूप झाल्या असे मला वाटले.

माझ्या १९४०च्या अटकेनंतर लखनौच्या मध्यवर्ती तुरुंगात मला जयदेव, शिव व गया प्रसाद भेटले. ते आता परिपक्व कम्युनिस्ट झालेले होते; ते सतत अभ्यास करीत व मुक्त होण्याच्या दिवसाकडे लक्ष ठेवत; त्यानंतर आपल्याला चळवळीतील आपली जबाबदारी पुरी करता येईल, अशा प्रकारच्या अवस्थेत व विचारात आपले आयुष्य कंठत होते. इतक्या वर्षांच्या तुरुंगवासातूनसुद्धा त्यांचा उत्साह व ध्येयनिष्ठा अचल होती. त्यांना त्यापुढेही किती दिवस कारावासात राहावे लागेल याची काही कल्पना नव्हती.

आम्ही गतकालाबद्दल बोललो. त्यांच्या अंदमानामधल्या खळबळजनक लढ्यांचा इतिहास मी ऐकला. त्यांनी माझ्याकडून कम्युनिस्ट चळवळीच्या वाढीबद्दल माहिती ऐकून घेतली. काही आठवड्यांत मला दुसऱ्या तुरुंगात हलविण्यात आले. हीच त्यांची व माझी शेवटची भेट. नंतर लाहोर जेलमध्ये किशोरीला अगदी थोड्या मिनिटांपुरता मी कसाबसा भेटू शकलो.

कम्युनिस्ट पक्षाबद्दल व त्याच्या ध्येयवादाबद्दल त्यांना इतकी तीव्र आत्मीयता वाटते की तुरुंगाबाहेर चाललेल्या घटनांबद्दल माहिती मिळविण्याचा ते सतत प्रयत्न करीत असतात आणि तसेच त्यांना जे जे राजबंदी भेटतात त्यांना स्वातंत्र्याकडे जाण्यासाठी केवळ कम्युनिस्ट तत्त्वप्रणालीच कशी आवश्यक आहे याचे स्पष्टीकरण करून त्यांच्यावर या विचारांचा खोल ठसा उमटविण्याची त्यांची धडपड चालू असते. त्यांच्या पक्षाबद्दलच्या विश्वासाला एकदाही तडा गेलेला नाही. जेव्हा भारतावर जपानी हल्ल्याचा धोका निर्माण झाला त्या वेळेस आपल्या देशबांधवांसाठी त्यांनी एक संदेश पाठविला : "रक्ताचा शेवटचा थेंब शरीरात असेपर्यंत फॅसिस्ट जपान्यांशी निर्धाराने लढा." जर जपानी हल्ला यशस्वी झाला असता तर त्यांची काय दुर्दशा झाली असती याची त्यांना कल्पना होती. आझादचे मोलाचे शिष्य व भगतसिंगचे सशस्त्र कॉम्रेड्स असे हे लोक दहशतवादी चळवळीची उच्च प्रतीची परंपरा पुढे चालवत आहेत आणि ते नेहमीच असे कट्टर क्रांतिकारक राहिले आहेत की ज्यांना भय माहीत नाही आणि ज्यांच्यात लोकांमधल्या आपल्याविरोधी असलेल्या चुकीच्या पण लोकप्रिय राजकीय जाणिवांना धक्का देणारे सत्य स्पष्टपणे मांडण्याचे धैर्य आहे.

*लेखनकाळ १९४५*

Acc. No. 124325
Date 31.3.08

I. I. A. S. LIBRARY

Acc. No.

This book was issued from the library on the date last stamped. It is due back within one month of its date of issue, if not recalled earlier.

CP&SHPS—519-I.I.A.S./2004-25-6-2004-20000.

भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या हौतात्म्याला पन्नास वर्षे झाली. तरीही आजतागायत त्यांचा विसर कुणाला पडलेला नाही. त्यांच्या अलोट धैर्याने आणि त्यागाने देशात जे चैतन्य निर्माण केले, ते आजच्या तरुण पिढीलाही क्रांतिकारी स्फूर्ती देत आहे. क्रांतिवीर चंद्रशेखर आझाद यांनी निर्माण केलेल्या 'हिंदुस्थान समाजवादी प्रजासत्ताक संघटने'चे भगतसिंग आणि त्यांचे साथी सभासद होते. त्यांच्यापैकी एकेकजण हा अक्षरश: देशप्रेमाने भारून गेलेला धैर्याचा मेरुमणी होता. ब्रिटिश सत्तेच्या अमानुष क्रौर्याला तुच्छ लेखून या सत्तेच्या विरुद्ध आमरण आणि हसतमुखाने झगडणे हे त्यांचे ब्रीद होते.

त्या वीरांची त्यांच्याच एका सहकाऱ्याने लिहिलेली ही कथा. आजसुद्धा कोणाही वाचकाला ती चित्तथरारक वाटेल आणि त्यांच्या स्मृतीने वाचक नतमस्तक झाल्याशिवाय राहणार नाही.

या कथेचे लेखक कॉ. अजय घोष हे पुढे कम्युनिस्ट पक्षात सामील झाले, पक्षाचे सरचिटणीस झाले. मरणापूर्वी भगतसिंगही साम्यवादाच्या उंबरठ... पोचले होते. त्यानंतर अंदमानात काळ्या पाण्या...ची ... सर्व क्रांतिकारक कम्युनिस्ट पक्षातच ... मूळ इंग्रजी पुस्तिकेचे मराठी भाषांतर कॉ. आत्माराम वैद्य यांनी इतके बेमालूम केले आहे की ते भाषांतर आहे असे क्षणमात्र वाचकाला वाटणारच नाही.

प्रस्तावनेतून

Library IIAS, Shimla
MR 954.038 G 346 B
00124325

किंमत : ४० रुपये

ISBN 81-88284-79-3